# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/९/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २५/०९/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ४. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ६. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| ७. | श्री. विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ८. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ९. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ११. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| १२. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १३. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १४. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १६. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०८ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. ७८, **दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे**.

**रवि व्यास :-**

दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७८ :-**

**दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ६६ :-**

दि. २४/०८/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, **सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अ हवाल आक्षेपांची पुर्तता करणेबाबतचा आढावा घेणे. (मा. स्थायी समिती दि. ०७/०९/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७३)**

**मा. सभापती :-**

२०१३-१४ चा लेखा परिक्षण अहवाल होता त्यामधील जी आक्षेपाची पूर्तता आहे त्याची काय पोझिशन आहे ते डिटेलमध्ये सांगा.

**दिग्वीजय चव्हाण :-**

सन्मा. सभापती महोदय सन २०१३-१४ चा जो महापालिकेचा लेखा परिक्षण अहवाल आहे. त्यामध्ये १४५ आक्षेप नमूद केले आहेत. त्याच्या व्यतिरिक्त माझी सभापती महोदयांना विनंती आहे २०१३-१४ ची माहिती न देता मी पूर्ण माहिती देतो. २००३-०४ पासून आपले ऑडिट रिपोर्ट आहेत. २००३-०४ पासून २०१४-१५ पर्यंत अहवाल निर्गमीत झाले आहेत. टोटल सगळे अहवाल जर पाहिले तर आपले १२ रिपोर्ट आहेत. १२ अहवालामध्ये ११४१ विविध विभागाचे अकराशे एक्केचाळीस आक्षेप आहेत. त्याच्यामध्ये मालमत्ता कर विभाग २३१, पाणी पुरवठा विभाग १०१, लेखा विभाग ७०, परवाना विभाग २५, जाहिरात १३, अतिक्रमण विभाग ४९, जनसंपर्क विभाग १४, सुवर्ण जयंती विभाग ८, नगररचना ४३, अग्निशमन विभाग ३३, आस्थापना विभाग १०९, परिवहन विभाग १४, विधी विभाग १, सार्व. आरोग्य विभाग २९, वैद्यकिय आरोग्य विभाग ३१, आरोग्य विभाग पशुसंवर्धन विभाग १७, स्थानिक संस्था कर ३५, भांडार विभाग १९, उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग ३१, महिला व बालकल्याण विभाग ४, संगणक विभाग २६, बांधकाम विभाग ५७, शिक्षण विभाग ५६, पे ॲन्ड पार्क विभाग १, वाहन विभाग ४२, अंध व अपंग कल्याण विभाग ३, सामान्य प्रशासन विभाग ३१, कर वसूली प्रभाग क्र. २-९, कर वसूली १०, नगरसचिव विभाग ४, नगरभवन ५, जकात विभाग १३, जन्म मृत्यू विभाग २, वाचनालय ५ सन्मा. सभापती महोदय हे ११४१ टोटल प्रलंबित परिच्छेद आहेत. त्याच्या संदर्भात मी रुजू झाल्यापासून आढावा घेतला. त्या आक्षेपाचा निपटारा करता येईल त्या अनुषंगाने पावल टाकली. वेळोवेळी पत्रव्यवहार केला त्याच्या सर्व प्रती आहेत. त्यामधून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे मागच्या महिन्याच्या १० तारखेला आम्ही कॅम्प लावला होता. सर्व स्थायी समिती सभागृहात बसलो होतो. लेखा विभागाचे मुख्य लेखाधिकारी ह्यांना ही सोबत घेतले होते. तिथे १२६ अनुपालन प्राप्त झाली त्याच्यात बांधकाम विभागाचे ५७, सचिव विभागाचे ४, परवाना विभागाचे २५, लेखा विभागाचे ४० असे एकूण १२६ अनुपालन प्राप्त झाले आहेत. ते प्राप्त झालेले अनुपालन आम्ही तपासणार आहोत. तपासणी प्रक्रिया चालू आहे. ही तपासणी झाल्यानंतर ह्याचे कोणते आक्षेप वगळता येतील आणि कोणते वगळता येणार नाही त्याचा अहवाल आयुक्तांच्या माध्यमातून स्थायी समितीच्या पटलावर दाखल करु. आपली मंजुरी मिळाल्यानंतर त्यांना पत्र देऊ. कुठले आक्षेप वगळण्यासारखे आहेत. आपल्या सर्वांच्या मान्यतेने आम्ही प्रत्येक महिन्याला कॅम्प लावू. त्याच्यामध्ये जास्तीत जास्त विभागाकडून प्रोत्साहन मिळेल निपटारा कमी करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**मा. सभापती :-**

कॅम्पची संकल्पना काय.

**दिग्वीजय चव्हाण :-**

कॅम्पची संकल्पना अशी आहे की कॅम्पमध्ये अनुपालन जी असतात ती त्या दिवशीच तपासणे अपेक्षित असतात. ब-याच वेळेला कागदपत्र अपूरी असतात. मग आम्ही त्यांना सुचना करतो की ही कागदपत्र आम्हाला पाहिजेत असा बदल पाहिजे. दिलेले अनुपालन ह्याचा शब्दप्रयोग बरोबर नाही असे तुमचे म्हणणे असेल तरच होऊ शकते. अन्यथा नाही हे सगळे आम्ही सांगतो त्यात सुधारणा करायला वेळ लागतो. तपासायला वेळ लागत नाही.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये मेजर कुठले आहे जे अजून आक्षेप पूर्ण झाले नाही असे मेजर काही आहे का?

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यामध्ये मालमत्ता कर, एल.बी.टी त्याच्यामध्ये ज्या काही प्रलंबित थकबाकी असतात त्या थकबाकी वसूलीचे परिच्छेद त्याच्यात आहेत. त्याचे सद्यस्थिती त्या आक्षेपाच्या अनुशंगाने आमच्या समोर आल्यानंतर आपल्याला ते मान्य झाल्यानंतरच आपण ते वगळणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

ऑडिटर साहेब हे जे आक्षेप घेतले गेले. ११४१ आक्षेप आहेत. ह्याच्या आक्षेपाची माहिती एसीजीला शासनाकडे देता का? राज्यशासन एसीजी ऑडिटर कंट्रोलर त्याच्याकडे माहिती पूरवली जाते का? अशाप्रकारे आमच्याकडे आक्षेप विभागीय अधिका-यांच्या विभागावर घेतले गेले आहेत. २००३ पासून सुरु आहेत. आजपर्यंत असे कोणते पाऊल उचलले का?

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय मुख्यलेखापरिक्षक जे लेखापरिक्षण करतात ते आपल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमाप्रमाणे करतात असे कोणते सर्क्युलर माझ्या पाहणीत नाही की आपण आपले अहवाल त्यांना कळवावे तशी प्रोसिजर नाही.

**जुबेर इनामदार :-**

आजपर्यंत १२६ अनुपालन अहवाल प्राप्त झाले. तुम्ही कॅम्प लावल्यानंतरही ह्याची अजून छाननी करायची बाकी आहे. ह्याचा अर्थ असा झाला की कुठेतरी हलगर्जीपणा होतो. विभागीय अधिकारी निवृत्त होऊन जातात हे आक्षेप संपत नाही. अशा अधिका-यावर कारवाई काय होते. ऑडिटचा अर्थ काय राहिला लेखा परिक्षणचा अर्थ काय?

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यावर प्रशासन उत्तर देईल.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ऑडिट करता त्यातून निकाल लावता चुकीचे आहे की बरोबर आहे योग्य नाही हे कुठेतरी कमी पडलात अशा विभाग अधिका-यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा अधिका-यावर काय कारवाई करणार. तुमची मांग काय असते. त्याच्यामध्ये तुमची काय मागणी असते का की असे केले पाहिजे. हा नियम अशाप्रकारे आहे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय जे आक्षेप घेतले जातात त्या आक्षेपामध्ये त्या परिच्छेदाचे स्वरुप नमुद केले जाते. त्याच्यावर समजा काही आक्षेप तपासताना प्रशासनाला काही दोष आढळला तर त्याच्यावर कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनाचे आहेत. लेखापरिक्षण विभाग त्यात नमूद जो विषय असतो त्या विषयाच्या अनुषंगाने अभिप्राय दिलेले असतात.

**जुबेर इनामदार :-**

आजपर्यंत तुम्हाला किती दोषी आढळले २००३ पासून मा. आयुक्त महोदय हा स्पष्ट विषय आहे. त्या विरोधात आम्ही करतो का म्हणजे असे चुकीचे काम करतात त्याच्या कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा करतात अशा अधिका-यांच्या विरोधात आमची भूमिका काय. आम्ही त्यांचे इन्क्रीमेंट थांबवतो का? कुठल्या प्रकारची कारवाई करतो का? हे असेच चालत राहणार. भिती कसली नाही मग ऑडिट कसले करायचे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

प्राप्त अनुपालनाचे ॲनलिसेस करताना आम्हाला ते समजेल आता काही सांगता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

१२६ चे अनुपालन तुम्हाला देण्यात आलेले.

**दिग्वीजय चव्हाण :-**

त्याची तपासणी चालू आहे. त्याचा अहवाल आपल्यासमोर ठेऊ.

**जुबेर इनामदार :-**

फक्त १२६ बाकीचे जे बाकी आहेत त्यांचे काय? ९० टक्के बाकी आहे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

ते आल्यानंतर आम्ही तपासणार.

**जुबेर इनामदार :-**

ते तुम्हाला अनुपालन अहवाल देत नाही.

**दिग्वीजय चव्हाण :-**

आपल्या माध्यमातून सभागृहाला आपण सुचना द्या.

**जुबेर इनामदार :-**

फक्त १२६ लोकांनी तुम्हाला अनुपालन दिले. १००० लोकांनी अजून दिलेले नाही. त्याच्यावर तुम्ही कारवाई काय करणार? आयुक्तांनी त्याच्यावर काय कारवाई केली. काय प्रोव्हिजन आहेत.

**दिग्वीजय चव्हाण :-**

११४१ आक्षेप आहेत. त्याच्यातली १२६ अनुपालन आली आहेत तर उर्वरित अनुपालन तात्काळ सादर करण्याचे आपण विभागाना निर्देश द्या.

**जुबेर इनामदार :-**

ते तुम्ही वारंवार केलेले आहे. तरी करत नाही म्हणून तुम्ही कॅम्प लावला विशेष बाब म्हणून. विशेष बाबमध्ये सुध्दा १२६ च आले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. सभापती महोदय ११४१ आक्षेप आले आहेत. त्यातले १२६ चे उत्तर विभागाकडून आले आहेत. बाकी विभागाला आम्ही सूचना देऊ हे आक्षेप फायनल केल्यानंतर वगळले जाणार.

**दिग्वीजय चव्हाण :-**

ते आपण स्टॅन्डिंग पटलावर ठेवणार.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ते केल्यानंतर जे फायनल होतील त्याच्यामध्ये काय अनियमितता आढळून आली तर प्रशासन कारवाई करेल.

**जुबेर इनामदार :-**

अनियमितता आढळून आली म्हणून ऑडिटरनी आक्षेप नोंदवले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्याच्यानंतर विभागाचे उत्तर घेतो त्याचे पुरावे किंवा सर्क्युलर, ठराव असतील त्याच्यानंतर फायनल होऊ शकते ते त्याच्यातून वगळले जाऊ शकते. त्यानंतर जे फायनल राहतील त्याच्यामध्ये काय अनियमितता असेल, प्रशासकीय स्वरुपाचे असतात कार्यपध्दतीच्या संदर्भात काही आर्थिक असतील त्याच्यानुसार कारवाई केली जाईल.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचे जे कर्तव्य आहे ते पार पाडत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ते बरोबर आहे कामकाज सुधारणा करण्याच्या अनुषंगाने असतात काही आर्थिक असतात, त्याच्यामध्ये दखल घ्यावी.

**मा. सभापती :-**

ऑडिटर साहेब बोलले आम्ही सुरुवात केली. म्हणजे ह्याच्या अगोदर ऑडिटर होते त्यांनी सुरुवात केली नव्हती. त्याच्यावर ॲक्शन घेतली पाहिजे. ११४१ पैकी १२६ म्हणजे १० ते १५ टक्के आक्षेपाची पूर्तता झाली साहेब ही अक्षम्य बाब आहे. आपल्याकडे इंटरनल ऑडिट होते का?

**दिग्वीजय चव्हाण :-**

आपल्याकडे होत नाही.

**जुबेर इनामदार :-**

हे एक्सटरनल आहे इंटरनल नाही.

**दिग्वीजय चव्हाण :-**

अंतर्गत लेखापरिक्षक............

**मा. सभापती :-**

तुम्ही जे करतात.

**दिग्वीजय चव्हाण :-**

हे अंतर्गत लेखापरिक्षण नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही ऑडिटर आहेत. म्हणजे तुम्ही कोणतेही बिल कोणतेही देयक किंवा कोणतीही रिसीप्ट तुम्ही चेक करतात. त्याच्यानंतर त्या पुढे जातात.

**दिग्वीजय चव्हाण :-**

हो.

**मा. सभापती :-**

विदाऊट चेकिंग होत नाही. तुमच्याकडे कोणतीही टिप्पणी येते. कोणतेही डिसीजन तुमच्यासमोर येते. पॉलिसी मॅटर असेल किंवा कोणताही निर्णय असेल तो तुमच्या डिपार्टमेंटसमोर येतो. तुमच्या डिपार्टमेंट समोर येऊन सुध्दा ११४१ क्वेरीज आहेत. तुमच्या डिपार्टमेंटकडून पण काही चूका होतात.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय तसे म्हणता येणार नाही कारण ह्याचे विश्लेषण केले तर समोर ज्या फाईल येतात त्या एक्सपेन्डीचर साईडच्या फाईल येतात. एक्सपेन्डीचर साईडचे ऑडिट होते. इन्कम साईडच्या फाईल आमच्याकडे येत नाही आणि मेजर ऑब्जेक्शन इन्कम साईडवर राहते.

**मा. सभापती :-**

म्हणजे ह्याचा अर्थ इन्कम साईड पण चेक करणे गरजेचे आहे. त्याच्यावर काय प्रोव्हिजन करणार? तुम्ही आता काय कायदा करणार. मेजोरीटी आपले जे आक्षेप आहेत ते इन्कम साईडचे आहेत.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यामध्ये आमचा तोच प्रयत्न आहे की आमचे २०१५-१६ चे ऑडिट आहे. २०१५-१६ चे ऑडिट तत्काळ संपवण्याचा प्रयत्न आहे. आमच्याकडे स्टाफ कमी आहे. मागच्या वेळी आम्ही विनंती केली होती. २०१६-१७ चे ऑडिट तात्काळ हाती घ्यायचे आहे म्हणून आम्ही सेवा निवृत्त कर्मचारी घेण्याची जाहिरात काढली आहे.

**मा. सभापती :-**

दोन दिले आहे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

ते २०१५-१६ चे ऑडिट करतात. सॅमलटेनीसली आम्हाला २०१६-१७ चे ऑडिट आम्हाला सुरु करायचे आहे. कारण आपण ३ वर्ष पेन्डींग आहोत. जर हे करन्टला आले तरच करंटचे रिसीप्ट आम्हाला तपासता येईल. २०१५-१६, २०१६-१७ आणि २०१७-१८ तीन्ही वर्षाचे पेन्डींग ऑडिट संपवून करन्टला आलो. कारण मागचे तपासून ते होऊन गेलेले असते म्हणजे आम्हाला करंटमध्ये पण तपासता येईल. तो आमचा प्रयत्न आहे.

**मा. सभापती :-**

आपला जो एक्सपेन्डीचर आहे तो ४० ते ४५ टक्के आपण पगारावर खर्च करतो. डिपार्टमेंट अजून एक्स्ट्रा कर्मचारी उपलब्ध करायला लागले. तर आपला खर्च मोअर दॅन ५० टक्के होईल. किंवा आपले जे एक्झीस्टींग कर्मचारी आहेत त्यांना ट्रेन करुन त्यांच्याकडून का करत नाही.

**दिग्वीजय चव्हाण :-**

आम्ही जो स्टाफ मागतो तो आमच्या मंजूर जो प्रपोज आकृतीबंध केला आहे त्याच्या मर्यादेतच मागतो.

**मा. सभापती :-**

आकृतीबंध मंजूर भरपूर आहे. फायरब्रिगेडमध्ये पण जास्त मंजूर आहे, आरोग्य विभागात पण मंजूर आहे. प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये मंजूर आहे परंतु प्रत्येक गोष्ट पॉसिबल होऊ शकत नाही.

**दिग्वीजय चव्हाण :-**

स्टाफ असल्याशिवाय ऑडिट करु शकत नाही. स्टाफ नसेल तर काय करणार.

**मा. सभापती :-**

अक्षम्य चूकीची बाब आहे. ११४१ पैकी १२६ लोकांनी फक्त पूर्तता केली. आयुक्त साहेब गंभीर बाब आहे. ह्याचे भरपूर क्वेरीज आहेत. रिसीप्ट पण चेक केले पाहिजेत. आयुक्तांना सांगून प्रस्ताव तयार करा की प्रत्येक रिसीप्ट बाब सुध्दा तुमच्या डिपार्टमेंटमधून ओ.के. करुन आली पाहिजे जेणेकरुन आक्षेप कमी होतील.

**जुबेर इनामदार :-**

ऑडिट विभागावर आक्षेप घेतले. सगळे काही तुमच्यामधूनच जाते. आपण कुठेतरी कमी पडतो असे तुम्हाला वाटत नाही का? बाकी शिल्लक राहीले ते कधीपर्यंत करणार. त्याला काही डेडलाईन वगैरे देणार की नाही.

**दिग्वीजय चव्हाण :-**

आम्ही वेळोवेळी डेडलाईन देऊन पत्र काढले, कॅम्पमध्ये १२६ आले. म्हणून आम्ही प्रत्येक महिन्याला कॅम्पचे आयोजन करतो. हे मोठे काम आहे.

**मा. सभापती :-**

ऑडिटर डिपार्टमेंट प्रत्येकांना वेळोवेळी लेटर देते. परंतु आक्षेपांची पूर्तता होत नाही तुम्ही त्यांना एक डेडलाईन द्या. ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व विभागानी आपआपल्या आक्षेपाची पूर्तता करावी आणि अहवाल सादर करावा. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

एक महिना सफिशियंट आहे.

**मा. सभापती :-**

तुमचे काय मत आहे एक महिना सफिशियंट आहे का?

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय जरी एक महिन्यात सगळे ऑब्जेक्शन आले तर ते एवढे ऑब्जेक्शन तपासणे आम्हाला शक्य होणार नाही. ११००-१२०० ऑब्जेक्शन आहेत.

**मा. सभापती :-**

१२६ आले एका महिन्यात अजून १०० आले. ३१ ऑक्टोबर पर्यंत सर्वांना डेडलाईन द्या. जेवढे येतील त्याची आम्हाला फिगर द्या. एवढ्या आक्षेपाची पूर्तता झाली आहे. आम्हाला चेक करणे बाकी आहे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

माझी विनंती आहे एका महिन्यात १० टक्के आली तर आपण साधारण २० टक्के टार्गेट द्यावे. म्हणजे साधारण २०० ते २५० महिन्याला येतील आणि ३ ते ४ महिन्याच्या ड्राईव्हमध्ये ते संपवावे.

**मा. सभापती :-**

तुम्ही सगळ्यांना टार्गेट द्या की एका महिन्याच्या आत तुम्हाला आक्षेपाची पूर्तता झाली पाहिजे. ३१ ऑक्टोबर. पूढचा विषय घ्या.

**(सदर प्रकरणाचा आढावा घेण्यात आला.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ९२ अन्वये महानगरपालिका ठेवींबाबत अवलोकन करणे. (मा. स्थायी समिती दि. ०७/०९/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७४)**

**मा. सभापती :-**

आपल्या महापालिकेच्या किती ठेवी ठेवल्या आहेत त्याची लिस्ट आहे का?

**सुरेश घोलप :-**

आपल्याकडे ज्या राखीव निधी आहेत. ते आपण फिक्स डिपॉझिटमध्ये ठेवतो १० प्रकारच्या राखीव निधीची अमाऊंट फिक्स डिपॉजिटमध्ये ठेवली आहे. त्यामध्ये कर्मचारी निवृत्ती वेतन ३२ कोटी १२ लाख ७० हजार ४६, वृक्ष संवर्धन निधी १ कोटी ४२ लाख ८७ हजार ११०, वेतन राखीव निधी ९ कोटी ९१ लाख ७७ हजार ६९०, घसारा निधी २ कोटी ८१ लाख ७२ हजार ७८४, विकास निधी ७९ लाख ४७ हजार ६०७, कर्मचारी कल्याण निधी ८३ लाख १७ हजार २९९, जल व मलःप्रवाह निधी १५ कोटी ६० लाख ९८ हजार ७३५, आग सुरक्षा निधी २५ कोटी ८२ लाख ४७ हजार ९४, परिभाषिक अंशतः निधी १४ कोटी ७८ लाख ६५ हजार ९३३, भविष्य निर्वाह निधी ३३ कोटी १५ लाख ६९ हजार ८० असे टोटल १३७ कोटी २९ लाख ५३ हजार ३७८ आपल्या फिक्स डिपॉजिटमध्ये ठेवल्या आहेत.

**जुबेर इनामदार :-**

किती टक्क्याने दिले.

**सुरेश घोलप :-**

आपण नॅशनल बँकेचे प्रत्येक महिन्याला रेट मागवतो त्याच्यामध्ये ज्यांचे जास्त रेट असतील त्या बँकेत आपण ठेवतो.

**जुबेर इनामदार :-**

ह्याची प्रसिध्दी करायची असते की आमच्याकडे एवढे पैसे आहेत आम्ही ठेवी ठेवणार आहोत. जी बँक तुम्हाला जास्तीत जास्त रेट ऑफ इंटरेस्ट देईल त्या बँकेत ठेवायचे असते.

**सुरेश घोलप :-**

मा. सभापती आपण प्रत्येक बँकेला बायहॅन्ड लेटर देत असतो.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही प्रसिध्दी करा जाहिरपध्दतीने.

**सुरेश घोलप :-**

प्रत्येक बँकेला आपण अप्रोच होतो.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही प्रसिध्दी करु शकता. तुम्ही बोलू शकता आम्हाला २०० कोटी ठेवी ठेवायची आहे. गोपनिय पध्दतीने पत्र पाठवायची काय गरज आहे.

**मा. सभापती :-**

ऑडिटर साहेब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ९२ अन्वये स्थायी समितीच्या मंजूरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व ठेवी व गुंतवणूकीक करील आणि आयुक्तास तशाच मंजूरीने अशा रितीने ठेवलेल्या ठेवी कोणत्या वेळी काढून घेता येतील किंवा कर्जावरती विकता येतील असा स्पष्ट नियम आहे. माझ्या माहितीप्रमाणे एकदाही महापालिकेनी स्थायी समिती पूढे कधी सादर केले नाही की आपल्याला फिक्स डिपॉझिट एवढी ठेवी ठेवायची आहे. त्यांनी नियमाचा भंग केला. नियम असे म्हणतो तुम्ही प्रत्येक वेळी स्थायी समितीच्या मंजूरीने ठेवी ठेवली पाहिजेत. सन्मा. सदस्य जुबेर बोलले की तुम्ही प्रसिध्दी करायला पाहिजे. आपण जे टेंडर प्रसिध्द करतो की मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कुठल्या मालमत्ता भाड्याने द्यायच्या असतील की सगळ्यात जास्त देकार देणाऱ्याला आपण देऊ किंवा काही काम करायचे असेल तेव्हा कमी खर्च ज्याचा येईल त्याला आपण काम देऊ असे असताना सुध्दा तुम्ही फक्त लेटर देणार ते चुकीचे आहे.

**सुरेश घोलप :-**

मा. सभापती महोदय आपण स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि. ०२/०९/२०१६ अन्वये एक मुख्य लेखाधिकारी ह्यांनी राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकामध्येच गुंतवणूक करण्यात यावी. तसेच महानगरपालिका हद्दी बाहेरील बँकेत गुंतवणूक करण्यात येवू नये असे मा. स्थायी समितीने मंजूरी दिली.

**जुबेर इनामदार :-**

वेळोवेळी स्थायी समितीला माहिती द्यायची नाही. कायमस्वरुपी अधिकार देण्यात आले असा कुठे उल्लेख केलेला नाही.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ६२ जो विषय आहे. वित्ती वर्ष २०१५-१६ वार्षिक जमा खर्चाच्या अवलोकनाबाबत हा विषय वेगळा आहे. ह्याच्यामध्ये तुम्हाला ॲप्रोच कुठे केले. महानगरपालिका कार्यरत असलेली बँक खाती पाहता ज्या खात्यावरुन कोणतेही व्यवहार होत नाही किंवा नको असलेली बँक खाती बंद करुन ज्या बँका जास्तीत जास्त सेवा पुरवतील अशा बँकामध्ये नविन खाती उघडण्यात यावी. राखीव निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी. ह्यासाठी मुख्य लेखाधिकाऱ्यांनी नियत दिनांकास मनपा हद्दीतील राष्ट्रीयकृत बँकाकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेमध्ये गुंतवणूक करण्यात यावी. तसेच मनपा हद्दी बाहेरील बँकेत गुंतवणूक करण्यात येऊ नये. ह्यासाठी आजची सभा मंजूरी देत आहे. ह्यात कुठे म्हंटले आहे तुम्ही लेखाधिकाऱ्यांना पॉवर दिले आहेत असे कुठे म्हंटले आहे.

**जुबेर इनामदार :-**

कायमस्वरुपी कुठे अधिकार दिले आहेत. माहिती द्यायची आम्ही कुठे विरोध करणार.

**मा. सभापती :-**

ते काम मुख्याधिकाऱ्यांचेच आहे.

**जुबेर इनामदार :-**

अवलोकनासाठी तरी पाठवा.

**मा. सभापती :-**

हे अकाऊंट डिपार्टमेंटचे काम आहे की त्यांनी जास्तीचे दर मागवावे. आम्ही तेच म्हणतो. परंतु स्थायी समितीची मंजूरी घ्यावी. त्यांनी स्थायी समितीच्या ठरावाचा आधार घेतला. हे काय म्हणते की, स्थायी समितीच्या मंजूरीने मा. आयुक्त सर्व ठेवी गुंतवणूक करेल. म्हणजे स्थायी समितीची मंजूरी पाहिजे आणि इथे काय म्हंटले आहे. निधी राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात यावी त्यासाठी मुख्य लेखाधिकाऱ्यांनी नियत दिनांकास मनपा हद्दीतील राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागवून म्हणजे व्याजदर मागवून घ्यायचे आहेत. हे काम ह्याच डिपार्टमेंटचे आहे. त्यांनीच व्याजदर मागवायला पाहिजे. दुसऱ्या डिपार्टमेंटचा ह्याचा काही संबंध नाही. तुम्ही रेट मागवा आणि स्थायी समितीला ठेवायचे. साहेब कायदा क्लियर म्हणतो स्थायी समितीच्या मंजूरीने आयुक्तांनी मनपाच्या वतीने ठेवी ठेवायच्या. ह्या ठरावामध्ये असे कुठेही म्हंटलेले नाही की, मुख्यलेखाधिकाऱ्यांना आम्ही प्राधिकृत केले आहे आणि मुख्य लेखाधिकारी सही करणार. आम्ही नाही म्हंटले तरी मुख्य लेखाधिकारी सही करणार. मुख्य लेखाधिकाऱ्यांनी व्याजदर मागवले पाहिजे आणि व्याजदर मागवून त्यांनी सिलेक्ट केले पाहिजे आणि स्थायी समितीची मंजूरी घेतली पाहिजे. याच्यानंतर मा. आयुक्त साहेब ह्याच्यापुढे कोणत्याही ठेवी स्थायी समितीच्या मंजूरीनेच ठेवी ठेवाव्या. तुम्ही ज्यावेळी त्यांच्याकडून मागवणार तेव्हा पेपरला ॲड द्या आणि ॲड बरोबर मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व राष्ट्रीयकृत बँकांना पत्र द्या. काही बँक मॅनेजर इंग्रजी पेपर वाचतात, काही गुजराती पेपर वाचतात, काही हिंदी वाचतात. काही मराठी पेपर वाचतात, सगळे विभन्न पेपर वाचत असल्यामुळे त्यांना समजा तुम्ही मराठी पेपरमध्ये ॲड दिली तर ती कळणार नाही. म्हणून तुम्ही असा डाटा रेडी करा. जर तुम्ही पेपरची ॲड काढली की सगळ्यांना कळले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय याचा ठराव करा. तुमचा विषय विषयपटलावर आहे, याचा ठराव होईल.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय, असा एक प्रॉब्लम येऊ शकतो की समजा ह्यांनी ॲड मागीतल्यानंतर आपल्याकडे ह्याच्यामध्ये जो काळ जाणार आहे, एखाद्या दिवशी रेट मागवले आणि आपली मंजूरी मिळायला ५-६ दिवस गेले.

**सुरेश घोलप :-**

ते अगोदर करणार पण आपले रेट चेंज होतात. आपला ४-५ दिवसाचा कालावधी जाईल.

**दिग्वीजय चव्हाण :-**

ज्यादिवशी रेट मागवले ते सभापती महोदयांना दाखवायचे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्तांनी सांगितले की आपली ३१ ऑक्टोबरला मुदत संपणार आहे. तर तुम्ही एक महिना अगोदर सुरुवात करा. सुरुवात केल्यावर सांगा.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मुदत संपल्यावर ३१ चेच रेट कन्सीडर करायला लागतील.

**मा. सभापती :-**

३१ चे रेट कन्सीडर करा पण सगळ्यानंतर रेग मागवून घ्या. तुम्ही तयारी अगोदर करा. त्याला सांगा की, आम्ही तुम्हाला १  नोव्हेंबर पासून देणार आहोत. ते त्या हिशोबाने करतील आम्ही जेव्हा बँकेमधून लोन काढतो. त्यावेळी त्यांचा जो रेट असतो त्या रेटपेक्षा ते लोक आपल्याला स्पेशल केस हेड ऑफीसला मंजूरी घेवून कमी करुन देतात. २००५ ला जेव्हा एका कंपनीने लोन घेतले होते.

**सुरेश घोलप :-**

आपण एक महिना किंवा १५ दिवस अगोदर रेट मागवणार ते त्यावेळचे रेट देतात. ३० ऑक्टोबरला जर रेट चेंज झाले तर ते कमी करतात.

**मा. सभापती :-**

घोलप साहेब, तुमची बार्गिंग पॉवर खुप कमी आहे. तुम्ही सर्व बँक मॅनेजरला स्थायी समितीपुढे हजर करा. आम्ही तुम्हाला जास्तीत जास्त रेट करुन देऊ. आम्ही पण बिझनसमन आहोत. आम्ही जेव्हा मोठे लोन घेतो त्यावेळी आम्ही बँकांना ॲप्रोच करतो ते रेट निगोशिएशन करुन आम्हाला कमी रेटने लोन देतात. आपण जर त्यांना डिपॉझीट देतो तर बट नॅचरल एवढी मोठी डिपॉझीट आहे. जर १०० टक्के रेट वाढवून देतील.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, आपल्याकडे वाटाघाटी आहे. निविदा प्रक्रियेमध्ये बरीच मेहनत होत असते. ह्या कामामध्ये का घेत नाही.

**मा. सभापती :-**

निवड समितीसमोर हा विषय आला तर नक्कीच फायदा होईल. ह्याला आपण ठराव करु या. ह्याचा ठराव नंतर करु. पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, **माहे एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१७ तसेच सन २०१७-१८ वार्षिक जमा खर्चाचे अवलोकनाबाबत. (मा. स्थायी समिती दि. ०७/०९/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७५)**

**मा. सभापती :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेवू.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८२, **आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकिय अधिकारी यांना ०६ महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अ धिकाऱ्यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणे आहे.**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | मागील नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|
| **1.** | डॉ. विक्रम निराटले | पशुवैद्यकीय अधिकारी | दि.**05/03/2018** ते दि.**04/09/2018** |

सदर **पशु**वैद्यकीय अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती केली असुन **सदर** अधिकाऱ्याची मुदत दि.**04/09/2018** संपूष्टात **येत** आहे**.** त्याना दि.**15/09/2018** रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **तसेच दि.16/09/2018 रोजी शासकीय सुट्टी असल्याने** दि.**17/09/2018** ते दि.**16/03/2019** पर्यंत **06** महिन्यासाठी नियुक्तीचे नवीकरण करणे आहे**.** सदर आरोग्य विभागाने दिलेल्या दि.**31/07/2018** रोजीच्या आकृतीबंधबाबतच्या पत्रात आरोग्य विभागाकरीता पशुवैद्यकीय अधिकारी हे पद **आकृतीबंधातील मंजूर पद आहे.**

सदर **पशुवैद्यकीय अधिकारी यांची मुदत** दि.**04/09/2018 रोजी** संपूष्टात येत **आहे.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम **53 (3)** नुसार **06** महिन्**यां**करीता नियुक्ती**चे नवीकरण करणे** बाबत मा**.** स्थायी समिती**स अधिकार असल्याने मा. स्थायी समितीची** मंजूरी घे**ऊन वरील पशुवैद्यकीय अधिकारी यांना 01** दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **29-9-2018 पर्यंत कार्योत्त्रट मंजूरी व पुढे 03-03-2019 पर्यंत नियुक्तीचे न वीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, हे बसतात कुठे? पशु वैद्यकिय अधिकारी ह्यांचा दवाखाना कुठे आहे?

**मा. सभापती :-**

काल मी त्यांना बोलावले होते. त्यांना बसायला जागा नाही. त्यांना महापालिकेत जिथे जागा मिळेल तिथे बसतात आणि ते एवढे काम लावले आहे. तुमचा परमनन्ट कर्मचारी आणि अधिकारी एवढे काम करत

नसेल. त्याला आपण सलायन्सेससाठी घेतले ते सलायन्ससचे काम करायचे आणि पशुची गणना पण करायची भरपुर काम दिली आहेत.

**जुबेर इनामदार :-**

स्टेबलायझेशन ठेका पध्दतीवर देण्यात आलेले आहे.

**मा. सभापती :-**

त्याच्यावर ऑर्ब्जरवेशन किती काम त्यांनी केली, किती कुत्र्यांना नसबंदी केलेली आहे, ती प्रोपर आहे की नाही? पिसाळलेले कुत्रे त्यांची डेव्हलपमेंट त्या ठेकेदारांनी पिसाळलेल्या कुत्र्याच्या केसेस बनवल्या की नाही? भरपुर कामं दिली आहेत. मध्यंतरी डुक्कर पकडण्याचे काम ते पण करतात. त्यांना भरपुर काम दिली आहेत.

**जुबेर इनामदार :-**

पशु वैद्यकिय आधिकारी आपण नेमला आहे. तर लोकांपर्यंत पोहोचायला त्यांना जागा पाहिजे. मी लोक प्रतिनिधी असताना, आम्हाला माहित नाही. माझ्या घरामध्ये एक पालतु प्राणी आहे. मला त्याला कुठे घेवून जायचे असेल तर कुठे जाऊ.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, पशु वैद्यकिय अधिका-यांसाठी महापालिकेमध्ये एक व्यवस्थित जागा किंवा त्यांना सलायन्सीस सेंटर आहे तिथे बसण्याची व्यवस्था करावी. ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८२ :-**

**आरोग्य विभागात ठोक मानधनावर कार्यरत असलेले पशुवैद्यकिय अधिकारी यांना ०६ महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणेबाबत.**

ठराव क्र. ६८ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तात्पुरत्या स्वरुपातील ठोक मानधनावर कार्यरत असले ले पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना 06 महिन्यांसाठी नियुक्तीस नवीकरण करणे आहे.**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | मागील नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|
| **1.** | डॉ. विक्रम निराटले | पशुवैद्यकीय अधिकारी | दि.**05/03/2018** ते दि.**04/09/2018** |

सदर **पशु**वैद्यकीय अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती केली असुन **सदर** अधिकाऱ्याची मुदत दि.**04/09/2018** संपूष्टात **येत** आहे**.** त्याना दि.**15/09/2018** रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **तसेच दि.16/09/2018 रोजी शासकीय सुट्टी असल्याने** दि.**17/09/2018** ते दि.**16/03/2019** पर्यंत **06** महिन्यासाठी नियुक्तीचे नवीकरण करणे आहे**.** सदर आरोग्य विभागाने दिलेल्या दि.**31/07/2018** रोजीच्या आकृतीबंधबाबतच्या पत्रात आरोग्य विभागाकरीता पशुवैद्यकीय अधिकारी हे पद **आकृतीबंधातील मंजूर पद आहे.**

सदर **पशुवैद्यकीय अधिकारी यांची मुदत** दि.**04/09/2018 रोजी** संपूष्टात येत **आहे.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम **53 (3)** नुसार **06** महिन्**यां**करीता नियुक्ती**चे नवीकरण करणे** बाबत मा. स्थायी समिती**स अधिकार असल्याने मा. स्थायी समितीची** मंजूरी घे**ऊन वरील पशुवैद्यकीय अधिकारी यांना 01** दिवसाचा तांत्रिक खंड देऊन **29-9-2018 पर्यंत कार्योत्त्रल मंजूरी व पुढे 03-03-2019 पर्यंत नियुक्तीचे नवीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८३, **महानगरपालिका आस्थापनेवरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नवीकरण करणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा. महासभा ठराव क्र. १३८ अन्वये व दि. ०३/०३/२०१६ रोजीच्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुलेखकांची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र नागनाथ चव्हाण | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| २. | श्री. अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३. | श्री. गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२०१८ प्रकरण क्र. १२६ ठराव क्र. १०९ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि. २१/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि. २१/०९/२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे.

महानगरपालिका मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखकांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून व दि २३-०९-२०१८ रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असल्याने दि. २४/०९/२०१८ ते दि. २३/०३/२०१९ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नेमणुकीचे नवीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८३ :-**

**महानगरपालिका आस्थापने वरील ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असणाऱ्या लघुटंकलेखक यांच्या नेमणूकीचे नवीकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात मा. स्थायी समिती ठराव क्र. १० अन्वये ०४ लघुटंकलेखक यांची किमान वेतन दरानुसार सहा महिन्यांकरिता नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यापैकी ०१ लघुटंकलेखकाने राजीनामा दिलेला आहे. उर्वरित ०३ लघुटंकलेखक कार्यरत आहेत.

मा. महासभा ठराव क्र. १३८ अन्वये व दि. ०३/०३/२०१६ रोजीच्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयुक्त यांना सर्व विभागाचे किमान वेतनाबाबतचे दावे निकाली काढण्यासाठी प्राधिकृत केल्यानुसार किमान वेतन दरानुसार लघुटंकलेखक यांना वेतन अदा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लघुलेखकांची नावे | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र नागनाथ चव्हाण | लघुटंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. अनिल तुकाराम बहिरम | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |
| ३. | श्री. गुणवंत दयाराम सपकाळे | लघुटंकलेखक | नगरसचिव विभाग |

मा. स्थायी समिती सभा दि. २३/०३/२०१८ प्रकरण क्र. १२६ ठराव क्र. १०९ अन्वये सदर लघुटंकलेखकांच्या नियुक्तीस दि. २१/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअन्वये सदर लघुटंकलेखकांची मुदत दि. २१/०९/२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे.

महानगरपालिका मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त (मुख्यालय) यांचे बैठकांचे इतिवृत्तांत, प्रभाग समिती सभा, वृक्ष प्राधिकरण समिती सभा, महिला बालकल्याण समिती सभा इत्यादी सभांचे इतिवृत्तांत लिहीण्यासाठी लघुटंकलेखकांची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार तात्पुरत्या नेमणुकीसाठी मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेणे अनिवार्य आहे.

महानगरपालिकेच्या कामाची निकड व आवश्यकता पाहता सदर लघुटंकलेखकांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून व दि २३-०९-२०१८ रोजी रविवारची सार्वजनिक सुट्टी असल्याने दि. २४/०९/२०१८ ते दि. २३/०३/२०१९ पर्यंत ०६ महिन्यांकरीता नेमणुकीचे नवीकरण करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८४, **बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत. (मा. स्थायी समिती दि. २४/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६५)**

**रवि व्यास :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे दि.०४/१०/२०११ पासून नळजोडण्या देण्याचे बंद करण्यात आलेले होते. अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंशतः कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठयात वाढ झाल्याने दि.३०/०४/२०१७ पासून नविन जलजोडणी मंजूरी सुरु करण्यात आलेली आहे.

पाणी ही जिवनाश्यक बाब असल्याने अनधिकृत इमारतीत राहत असलेले नागरिक पाण्याशिवाय राहू शकत नाही हे उघड सत्य आहे. त्यामुळे सदर नागरिक चोरुन नळजोडण्या घेतात वा ज्या नळजोडण्या शेजारी आहेत त्यावरुन पाण्याचा वापर करतात. त्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मिळणेसाठी मागणी होत आहे.

नविन नळजोडणी मंजूरी मा. स्थायी समिती सभा दि.१८/०१/२००३ ठराव क्र.९३ नुसार देण्यात येत. आहे. सदर धोरणात अनधिकृत बांधकामास नळजोडणी देणेबाबतची बाब समाविष्ट नव्हती. सदर धोरणात अंशतः बदल करण्यात येत असून अनधिकृत बांधकामास नळजोडणी देणेबाबत सुधारीत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांनी झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयाचा निवारा निश्चित करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना दि.०१/०१/१९९५ नंतर परंतु दि.०१/०१/२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत मालमत्ता अशा मिळकतींच्या संदर्भात नविन नळजोडणी मंजुर करणेकरीता कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण असणे आवश्यक आहे.

अ) **बहुमजली इमारत याकरीता बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नविन नळजोडणी मंजुरीसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे व अटीशर्तींची आवश्यकता राहील.**

१) स्ट्रक्चर / वास्तूचा फोटो

२) मालमत्ता कराची आकारणी

३) अनधिकृत बांधकाम सन २०११ पुर्वी अस्तित्वात असल्याचा पुरावा

४) अ) सदर नळजोडणी आरोग्याच्या व मानवतेच्या दृष्टीकोनातून दिलेली आहे. ब) सदर नळजोडणीमुळे अनधिकृत बांधकाम अधिकृत होणार नाही. क) सदर नळजोडणीमुळे चालू असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या कार्यवाहीला बाधा निर्माण होणार नाही. ड) अनधिकृत बांधकामावर कारवाई झाल्यास नळजोडणी मंजूरी आदेश रद्द समजण्यात येईल. अशा अटीशर्ती नळजोडणी मंजूरी आदेशात समाविष्ठ करण्यात याव्यात.

पाणीपट्टी भरणा केल्याने अनधिकृत बांधकाम हे अधिकृत होणार नाही व अनधिकृत बांधकामा विरुध्द निष्काशनाची कायदेशीर कारवाई करणेस आमची हरकत नाही असे स्वतंत्र हमीपत्र अर्जदाराकडून लिहून घेणे.

बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना मा. स्थायी समिती सभा दि.२९/१२/२०१४ ठराव क्र.१०७ व मा. महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र.९३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार नविन नळजोडणी शुल्काच्या तीन पट दराने नळजोडणी शुल्काची आकारणी करणे. Chapter X Water Supply नियम ९ (१) प्रमाणे मा.स्थायी समिती यांना भाडे ठरविण्याचे अधिकार आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नियामवली, पाणीपट्टी व नविन नळजोडणी शुल्क आकारणी करणेस तसेच महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांनी झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयाचा निवारा निश्चित करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी व्याप्त परिसरात झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची असल्यास ग्रुप कनेक्शन मंजूर करावे व डिजिटल मिटर लावुन त्यांना स्वतंत्र नळ जोडणी मंजूर करावी तसेच एका इमारती मधील १५ सदनिका ऐवजी १० सदनिकांसाठी १ इंचाची १ नळ जोडणी देणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय स्थायी समितीमध्ये झालेला आहे. अनधिकृत बांधकामांना नळजोडणी द्या. माणूसकीच्या नात्याने द्यावे. मात्र झोपडपट्टीला हा जो विषय आहे, आम्ही झोपडपट्टीवासियांच्या विरोधात नाही. बाकीची लोक जी मालमत्ता कर भरतात, इमारतीमध्ये राहतात त्यांची अडचण होणार आहे. मग प्रत्येकांना तसे देणार का? प्रत्येक सदनिकाधारकांनी तुमच्याकडे सुरुवात केली तर तुम्ही द्याल का? ग्रुप कनेक्शन पाण्यासाठी शासनाचे धोरण आहे. प्रत्येकाला इन्डीव्ह्युजवल द्यायला सुरुवात केली तर इमारतीवाले सुध्दा तुमच्याकडे पोहोचतील. आम्हालाही द्या.

**रवि व्यास :-**

मा. सभापती के परमिशन से, मिरा भाईंदर महानगरपालिका मे आज भी कई सारी झोपडपट्टी है। जैसे राई, मुर्धा जहॉ पे इन्डीव्ह्युजवल कनेक्शन काफी साल से दिया जा रहा है। गणेश देवल नगर, जय अंबे नगर, शास्त्री नगर, नेहरु नगर, पेणकर पाडा ये जो इलाका है। यहॉ पे पानी की गंभीर समस्या है की लोगो को जिना मुश्किल हो गया है। यह मद्देनजर रखते हुए हम जो डिजीटल मिटर का जो नया कन्सेप्ट लेकर आये है उसमे प्रोव्हीजन रहेगा की एक घर को कितना लिटर पानी देना है इसमे एक प्रोव्हीजन रहेगा की ५०० लिटर से जादा पानी एक घर मे नही जायेगा कनेक्शन देना अलग बात है। घर मे कितना लिटर पानी जाता है वह इम्पोर्टन्ट बात है। उस तरीके से हम कंट्रोल लेके आ सकते है।

**जुबेर इनामदार :-**

कैस कंट्रोल डिजीटल मीटर तुम्हारे हाथ मे तुम उसपे फिक्स रिडींगमे गर्व्हनर थोडे लगा सकते हो की २५० लीटर पानी चला गया। ५०० लीटर पानी चला गया तो बंदा हो जायेगा।

**रवि व्यास :-**

वैसाही लगाने का है।

**जुबेर इनामदार :-**

ऐसा मीटर आता नही है। पानी पुरवठा विभाग को बुलाओ, हमको भी बताओ। ऐसा कौनसा मिटर आता है। आपकी भावना बुरी नही पर जो सिस्टम है कही ना कही टेक्नीकली सोचना पडेगा। हर झोपडपट्टी

को इन्डीव्ह्युजवल कनेक्शन देना चालु करोगे तो सब माँगना शुरु करेंगे। फिर आप लोगो मे अंतर करना शुरु करोगे क्या? झोपडपट्टी निवासी इनको इन्डीव्ह्युजवल दो बिल्डींगवालेने माँगा तो उनका अधिकार वो भी तो मालमत्ताधारक है।

**रवि व्यास :-**

जो बिल्डींग है जितनी भी रहिवासी इमारते है वहॉ पे कैसा है की इन्डीव्ह्युजवल कनेक्शन हो गया क्यों की वहॉ पे कैसा है सोसायटी की पानी की सेप्रेट टाकी होती है। जिसमे पानी आ जाता है। और लोगो को जितना चाहिए उतना पानी रुम के अंदर सप्लाय हो जाता है, लेकीन स्लम मे इस तरह की व्यवस्था नही है। यह व्यवस्था ना होने की वजह से इस तरह से इन्डीव्ह्युजवल कनेक्शन दे रहा है। स्लम के अंदर इस तरीके की व्यवस्था नही यह व्यवस्था ना होने की वजह से इस तरीके की इन्डीव्ह्युजवल कनेक्शन दिए जा रहे है।

**जुबेर इनामदार :-**

आपकी बात बिल्कुल सही है। लेकीन ग्रुप कनेक्शन सिस्टम है ना।

**रवि व्यास :-**

स्लम के अंदर टाकी की व्यवस्था हो तो वहॉ के चाली के लोगोंको प्रॉब्लम नही है।

**जुबेर इनामदार :-**

उनको करना पडेगा ना। बिल्डींग मे टाकी बनाया वो म्युनिसिपल कॉर्पोरेशन ने नही बनाया उन्होने बनाया।

**रवि व्यास :-**

प्रॅक्टीकली स्लम और बिल्डींग की एक दृष्टी से देखेंगे तो फिर वो प्रॅक्टीकल पॉसीबल नही हो पायेगा स्लम मे अंदर जो लोग रहते है वो १० X १० की खोली मे रहते है। उधर चलने की जगह नही है तो वहॉ पे टाकी बनाने के लिए जगह किधर से आयेगी।

**जुबेर इनामदार :-**

मै वही कर रहा हू जिस रुम के अंदर चलने की जगह नही है तो उधर स्टोरेज की कॅपिसीटी किधर से आयेगी। इसलीए ग्रुप कनेक्शन होता है। छोटी झोपडी जो है उसमे चार लोग रहने के बाद पाँचवा ॲडजस्ट नही होता। पानी का ड्रम बाहर भरता है और काम चलता है। उसकी रिक्वायरमेंट भी कम है। आज अगर हम कनेक्शन देना शुरु करेंगे तो कुछ नही होगा। नाजाईश इस्तेमाल होगा। आज शहर मे बहोत पानी नही। आज भी ३६ घंटे के बाद पानी दे रहे है। २४ घंटे मे सप्लाय नही की ॲक्सेस वॉटर सप्लाय है और हम दे सकेंगे। सुर्या प्रकल्पाचे पाणी येईल तेव्हा येईल आज तर नाही ना आजच्या परिस्थितीत ॲक्सेस पाणी कुठे आहे? आजही ३६-४० तासांवर पाणी पुरवठा होतो. २४ तासांवर पाणी येईल तेव्हा द्या. तुमच्याकडे भरपुर पाणी असेल तर भरपुर द्या. आज तुमच्याकडे पाणी कुठे आहे. अनधिकृत बांधकामाचा जो विषय मांडला तो ठिक आहे. २०११ च्या आधीचे आहेत. त्यांना ग्रुप कनेक्शन द्यावे. त्यांच्यावर अन्याय झाला नाही पाहिजे. पानी एक गरजेची वस्तु आहे. अशाप्रकारे धोरण करु नका. शहरात आपण पाण्याचे कनेक्शन बंद केले होते. आजसुध्दा पाणी पुरवठाची परिस्थिती बघितली तर तुमच्याकडे २४ तासावर पाणी आहे का? आजही ३६-४० तासावर पाणी आहे. जर रिपेरिंग आणि एम.आय.डी.सी. ने बंद पुकारले तर त्यादिवशी तो पाणी ७० तासावर मिळतो.

**रवि व्यास :-**

शहर मे पानी के कनेक्शन मनपा से नही दिए जा रहे। लेकीन इसका मतलब यह नही की लोग पानी पी नही नहे है और पानी का युज नही कर रहे। उसमे यह होता था की यह जो पानी है वो दुसरे जगह जाता था और लोग पानी बचते थे। टॅंकर या इन्डीव्ह्युजवल लोग पानी बेचने का धंदा स्लम के अंदर करते थे। इलिगल टॅंकर है वो बंद हो जायेगा और स्लम के अंदर मे जो पानी के ठेकेदार थे, जो लोगों को पानी बेचते थे वो सारी चीजे बंद हो जायेगी। शहर मे जितना पानी है वो उतनाही रहेगा। वेस्ट नही होगा। उसका प्रॉपर युटीलायझेशन होगा।

**जुबेर इनामदार :-**

पाणी पुरवठ्याचे अभियंत्यांनी त्याचे निवेदन करावे की, पाणी पुरवठ्यामध्ये काही फरक पडणार नाही. जी परिस्थिती आहे तशीच राहील. ३६ तासानंतर पाणी येईल. आमचा ह्याला विरोध नाही पण तांत्रिक बाबींची चाचपणी केली पाहिजे. आपल्याला ती अडचण होणार आहे.

**मा. सभापती :-**

इन्डीव्ह्युजवल दिल्यावर एवढा फरक पडणार नाही आणि आपण डिजीटल मिटर लावून देणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

डिजीटल मिटरने तुमचे रिडींग डिजीटल येणार आहेत. तुमचा पुरवठ्यावर थोडे नियंत्रण राहणार आहे.

**मा. सभापती :-**

त्याचा दुरुपयोग कमी होईल. पाणी वेस्ट होणार नाही आणि आपल्याला कळेल की, ह्याच्यात किती पाणी जाते. त्याची गरज आहे मॅक्झीमम लोकांना आपण ग्रुप कनेक्शन दिलेले आहेत. २००-४०० मॅक्झीमम असतील त्यांना ग्रुप कनेक्शन पॉसिबल नाही. कारण एक झोपडी इकडे असेल तर दुसरी झोपडी तिकडे आहे. त्यामुळे त्यांना ग्रुप कनेक्शन मंजूर होणे अशक्य आहे. त्यामुळे असे कनेक्शन देणे गरजेचे असल्यामुळे हा विषय आपण आणला आहे. त्यामुळे शहरावर जास्त फरक पडणार नाही. आपण त्यांना अर्धा इंच कनेक्शन देतो. आपल्याकडे एम.आय.डी.सी. चे ३० ते ३५ एम.एल.डी. पाणी उचलायचे बाकी आहे. ते पण पाणी आता येईल.

**जुबेर इनामदार :-**

१५ सदनिकेच्या मागे एक इंचाचे कनेक्शन आणि एक झोपडीला १० X १० ची त्याला अर्धा इंचाचे कनेक्शन १५ सदनिकेमध्ये एका कुटूंबात चार लोक असतील तर किती झाले. ६० इंचाच्या मागे एक इंचाचे कनेक्शन आणि एका झोपडीमध्ये पाच लोक असतील तर त्याच्यामागे अर्धा इंचाचे कनेक्शन हा कोणावर अन्याय करता?

**अनिता पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते. माझे सहकारी बोलतात ते बरोबर बोलतात. पण झोपडपट्टीत जो राहतो किंवा तिकडे जो नगरसेवक आहे त्यांनी ही परिस्थिती अनुभवली आहे. पहिल्यापासून ग्रुप कनेक्शन दिलेले आहेत. पण त्या मागे एवढी भांडण होत होती. मला एवढ्या वेळा पोलीस स्टेशनला जायला लागले. झोपडपट्टीची मेन्टेलिटी फक्त भांडणाची असते. त्यामुळे एवढे प्रसंग उद्‌भवायचे तुम्ही जो पूर्वी ग्रुप कनेक्शन देत होता तो आता सिंगल केला. सिंगल केल्यामुळे युज जास्त केला असे नाही. एका परिवाराला एक ड्रम लागणार तर एकच ड्रम भरणार आहेत. त्युाळे भांडणाचा प्रकार कमी झाला आहे. त्याला सुध्दा अधिकार आहे ना. मी झोपडीत राहतो म्हणून मला ग्रुप कनेक्शन मधून पाणी भरायचे तो विषय त्याच्या डोक्यातून निघून जातो. कारण तो पण टॅक्स भरतो. झोपडपट्टीमधल्या लोकांना बिल्डींगमध्ये जशा टाक्या आहेत तशा टाक्या नाहीत. त्यामुळे ते साठा करुन ठेवणार आहेत. एक दिवस पाणी येत नाही, दोन दिवस कमी दाबाने पाणी येते. तेव्हा ते थोडासा पाणी साठवून ठेवतात. बाकी त्यांना कुठे हौस आहे की, भरपूर पाणी साठा करुन ठेवणार आहेत आणि वेस्ट करणार आहेत. बिल कोणालाच परवडत नाही. त्यामुळे जुबेर साहेबांना सांगेन तुम्ही मानवतेच्या दृष्टीने हा विचार करा. तुमचे पण म्हणणे बरोबर आहे. बिल्डींगमध्ये १५ च्या मागे १ इंचाचे कनेक्शन देता आणि झोपडपट्टीला प्रत्येक परिवाराला अर्ध्याचे देणार आहेत. अर्धा इंचाचे दिले तर ते २४ तास पाणी भरणार नाही. झोपडपट्टीचे ग्रुप कनेक्शन मागे बऱ्याच वर्षापासून दिलेले आहेत. ह्या ग्रुप कनेक्शनमध्ये ४-४ ते ५-५ लोकांना दिले आहे त्यांची एवढी भांडण होतात. कारण सगळ्यांना पाणीच जात नव्हते. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, झोपडपट्टीचा विचार करुन अर्ध्या इंचाचे कनेक्शन देण्यात यावे.

**जुबेर इनामदार :-**

ह्यांना बिलींग होणार आहे की नाही?

**अनिता पाटील :-**

बिल्डींगवाल्यांना १५ ऐवजी १० जणांना करा.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही मिटर लावल्यावर त्यांना बिल जाईल. मिटर रिडर किती आहेत ते विचारा. आमच्याकडे ६-६, ८-८ महिने मिटर रिडींग होत नाही. ते सांगतात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. पाण्याची व्यवस्था केली पाहिजे, २४ तास पाणी झाल्यावर तुम्ही भरपुर पाणी द्या.

**दिप्ती भट :-**

सदनिकांना १५ खाली एक कनेक्शन देतो तर त्याच्या बदली १० करा. दोन बिल्डींगमध्ये भांडण होतात आणि मग वेगवेगळे डिसीजन घेतात. कनेक्शन घ्यायला जातात तर १५ च्या मुळे देत नाही. सोसायटी

एक असते पण सेक्रेटरी, चेअरमन दोन असतात. दोन्ही समान करा म्हणजे झोपड्यांना पण द्या आणि ह्यांचे १० करा.

**जुबेर इनामदार :-**

तशी आमची सुचना घ्या.

**मा. सभापती :-**

असा प्रॉब्लम नाही. तसे असते तर सर्वांनी बोलले असते.

**दिप्ती भट :-**

माझ्या इथे केले आहे. मी किती भांडते. अजून किती प्रॉब्लम आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही एकटेच भांडता बाकी कोण भांडत नाही. म्हणजे शहरामध्ये पाणी बरोबर आहे.

**दिप्ती भट :-**

मी सोसायटीमध्ये कनेक्शनचे सांगते. म्हणजे ते १५ च्या मागे आहे ते १० च्या मागे केले तर.

**जुबेर इनामदार :-**

१० सदनिकांच्या मागे एक कनेक्शन करा. १५ सदनिकेएवजी १० सदनिकांना पाणी द्यावे अशी आमची सुचना आहे. समांतर न्याय द्या.

**मा. सभापती :-**

आपण १५ फ्लॅट म्हणतो ते वन रुम किचनचे पण असतात. वन बेडरुम, हॉल, किचन पण असतात. टू बेडरुम, हॉल, किचन, थ्री बेडरुम, हॉल, किचन पण असतात. मग १५ फ्लॅट टू बेडरुम, हॉल, किचन असते किंवा थ्री बेडरुम, हॉल, किचन असते तर त्यांना किती प्रॉब्लम.

**जुबेर इनामदार :-**

भरपूर प्रॉब्लम आहे. आम्ही १० ची सुचना करतो. तुम्ही पाच केले तर अती उत्तम.

**मा. सभापती :-**

त्याच्यासाठी नविन विषय घेऊन या.

**जुबेर इनामदार :-**

विषय चालला आहे त्याच्यामध्ये करता येईल ना. आता अनुपालन अहवाल अवलोकनाचा विषय होता. त्याच्यात ऑडीटर बँक ठेवीचा विषय आला होता. साहेब आज तुमची शेवटची सभा आहे. वर्षभरात चांगले काम केले. लोकांना सुविधा पुरवल्या. स्थायी समिती चांगली चालवली माझी आपल्याला विनंती आहे जाता जाता एक चांगले काम तुमच्या हस्ते करावे.

**मा. सभापती :-**

ठरावात इम्पलीमेन्टेशन करणार पॉलिसी आपली आहे.

**अनिता पाटील :-**

बिल्डींगवाल्यांना १० च्या मागे एक कनेक्शन द्यायला काही हरकत नाही.

**रवि व्यास :-**

मा. सभापतीजी आपने जैसे सुझाव दिया है जैसे २ बेडरुम हॉल किचन, ३ बेडरुम हॉल किचन है वो कन्सीडर करके हम लोग आगे इसके लिए कुछ नया विषय लेके कुछ प्रॉपरली धोरण बनाके हम लोग आगे नया विषय लेके इसको प्रॉपरली धोरण बनाके इसके बारे में विचार करके निर्णय लेंगे।

**मा. सभापती :-**

यह भी अच्छा सजेशन है।

**वर्षा भानुशाली :-**

पानी देना है तो सबको इकवल करके दो।

**अशोक तिवारी :-**

मा. सभापती साहेब झोपडपट्टी में १० x १५ के रुम में कही ८ आदमी रहते है, कही १५ आदमी भी रहते है। लेकिन १००० फुट के फ्लॅट में ७ आदमी रहते है, कही ३ आदमी भी रहते है।

**जुबेर इनामदार :-**

ऐसे कैसे १५ आदमी रहते है।

**अशोक तिवारी :-**

जुबेर भाई आप जरा देखीए शहर में स्लमवालो की हालत क्या है। आप पूछीए कैसे रहते है। वहाँ जाने के बाद अपने आँख से पानी आता है। हम नगरसेवक है हमारे पास २००० फुट १५०० फुट का फ्लॅट है।

**जुबेर इनामदार :-**

हम भी चाहते है की बाकी के लोगो का आँखो का पानी आप पोछीए। हमें भी बहुत तकलीफ है।

**अशोक तिवारी :-**

इसी शहर में मैं भी था कही पानी नही मिलता था। ५-५ दिन में पानी मिलता था आज पर्याप्त पानी मिल रहा है।

**जुबेर इनामदार :-**

आज ४० घंटे के बाद पानी आ रहा है। पाणी पुरवठा के अधिकारी इधर बैठे है इनको पूछो कितने घंटे के बाद पानी आ रहा है।

(सभागृहात गोंधळ)

**अशोक तिवारी :-**

गरिबो पे ध्यान दिजीए।

**जुबेर इनामदार :-**

हम विरोध नही कर रहे हम हमारी माँग कर रहे है। आप उनकी बात करते है तो क्या इस शहर में झोपडपट्टी ही है। बाकी भी लोग रहते है उनका भी ख्याल करो। १० च्या मागे करुन टाका.

**अनिता पाटील :-**

तेवढच पाणी वापरणार आहेत.

**वंदना पाटील :-**

गावातल्या लोकांचा पण विचार करा. एका घरात दोन भाऊ राहतात. ते वेगवेगळे राहतात आणि एकाच घराच्या नावाने कनेक्शन दिले जाते ते पण करा. दोन्ही भावांना कनेक्शन भेटले पाहिजे.

**वर्षा भानुशाली :-**

सकाळी गुड मॉर्निंग येत नाही. पाणी आले नाही असा कॉल येतो. अभी प्रॉब्लेम क्या है।

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो गणपतीच्यानंतर एम.आय.डी.सी ने शटडाऊन घेतले आहे. एम.आय.डी.सी चा काल दिवसभर पाणी बंद होता. कारण त्याचे शट डाऊनचे काम होते. त्यामुळे आजचा पाणी पुरवठा डिले होऊन चालला आहे.

**जुबेर इनामदार :-**

रेग्युलर किती तासाने पाणी येतो.

**सुरेश वाकोडे :-**

३२ ते ३८ तासापर्यंत पाणी पुरवठा होतो.

**जुबेर इनामदार :-**

तांत्रिक अडचणी आल्यातर ३५ किंवा ४० तासावर जातो. कधी लो प्रेशर कधी हाय प्रेशर हे प्रकार होतच राहणार. लांबीचा प्रवास करुन पाणी आपल्या शहरामध्ये येते.

**मा. सभापती :-**

साहेब पाणी का कमी येते.

**सुरेश वाकोडे :-**

काल शट डाऊनचा प्रॉब्लेम होता. आज रात्रीपासून पाणी पुरवठा चालू झाला आहे. जनरल पाणी ३२ ते ३८ तासावर सप्लाय होतो.

**मा. सभापती :-**

वाकोडे साहेब मध्यंतरी आपण पेपरला ॲड दिली होती की वॉटर ऑडिट सुरु करणार त्याची काय परिस्थिती आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आपले वॉटर ऑडिट ऑलरेडी सुरु आहे. एक दीढ वर्ष झाले काम सुरु आहे.

**मा. सभापती :-**

वॉटर ऑडिट करायला किती वर्ष लागेल.

**सुरेश वाकोडे :-**

त्याचे फायनल होत आले आहे.

**मा. सभापती :-**

कोणती एजन्सी आहे.

**सुरेश वाकोडे :-**

वॉटरनेट म्हणून एक एजन्सी आहे.

**मा. सभापती :-**

कधीपर्यंत त्यांचे काम संपणार आहे.

**सुरेश वाकोडे :-**

एक महिन्यात संपणार आहे.

**मा. सभापती :-**

ठीक आहे त्याचा ऑडीट रिपोर्ट द्या.

**सुरेश वाकोडे :-**

ऑडिट रिपोर्ट देतो.

**तारा घरत :-**

मा. सभापती साहेब झोपडपट्टीवाले इंडस्ट्रीला पाणी विकतात ना. इंडस्ट्रीला पण कनेक्शन द्या.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. बिल्डींगमध्ये १५ चे कनेक्शन आहे ते १० करु. वन रुम किचनला आपण कन्सीडर करायचे नाही. वन बेडरुम हॉल किचन असेल. ३ बेडरुम हॉल किचन असेल तर आपण १० वर करुया.

**वर्षा भानुशाली :-**

ते आपण कसे ठरवणार.

**मा. सभापती :-**

आता वन रुम किचन सदनिका बनत नाही.

**अनिल विराणी :-**

जे आहे त्यांना काय? वन रुम किचन आहे वन बी.एच.के, २ बी.एच.के. एकाच बिल्डींगला आहे.

**राजीव मेहरा :-**

शितल नगर में १ बी.एच.के., २ बी.एच.के एकही बिल्डींग में।

**अनिल विराणी :-**

सगळ्यांना समान करा.

**राजीव मेहरा :-**

नेक्स्ट मिटींग में स्क्वेअर मीटर के हिसाब से करना पडेगा।

**जुबेर इनामदार :-**

सुचनेचा समावेश करा.

**मा. सभापती :-**

बिल्डींगला कनेक्शन देणार तेव्हा १५ ऐवजी १० फ्लॅटला कनेक्शन द्या.

**अनिल विराणी :-**

ते कधीपासून चालू होईल.

**वर्षा भानुशाली :-**

आजपासून.

**अनिल विराणी :-**

आजपासून नविन बिल्डींग थोडी बनणार?

**जुबेर इनामदार :-**

जुन्याना पाणी नाही आणि नविनला देणार.

**अनिल विराणी :-**

आमच्या प्रभागात एक पण जागा नाही. नविन बिल्डींग बनणार नाही आम्ही काय करणार.

**मा. सभापती :-**

नियम बनेगा तो सबके लिए बनेगा। जुना और नया थोडी ना फरक करेगा।

**जुबेर इनामदार :-**

नियम म्हणजे जुन्यापासून नविनपर्यंत सर्वांना.

**अनिल विराणी :-**

जुन्याला पण द्या, नविनला आम्हाला काही हरकत नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही जी नविन कनेक्शन द्यायला सुरुवात केली तेव्हा तुम्ही नविन आणि जुन्याला पण दिली.

**अनिल विराणी :-**

सगळ्यांना समान करा जुन्याला पण पाहिजे.

**मा. सभापती :-**

गावठण एरियामध्ये जी घर आहेत त्यांची पण एक पॉलिसी तयार करा.

**अनिल विराणी :-**

त्याचे टॅक्स बाकी आहेत ते वसूल करा त्यांना नंतर द्या.

**मा. सभापती :-**

कनेक्शन देताना प्रॉपर्टी टॅक्स बाकी असेल तर तो भरुन घ्यायचा त्याशिवाय द्यायचे नाही.

**अनिल विराणी :-**

माझी एक सुचना आहे अगोदर तळ मजला होता. नंतर दुसरा, तिसरा केला.............

**मा. सभापती :-**

ऐसा थोडी ना १,२,३,४ बनाएगा।

**अनिल विराणी :-**

बरेच आहे. मिरा भाईंदर महापालिका माजी नगरसेवकांचे असे घर आहे.

**मा. सभापती :-**

साहेब ह्यांची सुचना चांगली आहे. जे कनेक्शन मागायला येतील त्यावेळी त्यांचे घर बघा. संपूर्ण टॅक्स लागला असेल तरच द्यायचे नाही तर त्यांना शास्ती लावून कर आकारणी करा आणि नंतर कनेक्शन द्या. ठराव मंजूर.

**अशोक तिवारी :-**

मा. सभापती साहेब यह ठराव को अभी से कायम करने को बोलीए।

**मा. सभापती :-**

इसमें लिखा है कायम करने जा रहे है। ठराव मांडा है।

**जुबेर इनामदार :-**

ठरावामध्ये समावेश करा आणि त्याची पूर्तता आजपासून सुरुवात करा.

**मा. सभापती :-**

२९ सप्टेंबर २०१८.

**जुबेर इनामदार :-**

सभापती धृवकिशोर पाटील यांना धन्यवाद.

**मा. सभापती :-**

संपूर्ण सदस्य, महापौर, उपमहापौर, आमदार सर्वांचे आभार.

**प्रकरण क्र. ८४ :-**

**बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकर्तींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत. (मा. स्थायी समिती दि. २४/०८/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ६५)**

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपु-या पाणी पुरवठयामुळे दि.०४/१०/२०११ पासून नळजोडण्या देण्याचे बंद करण्यात आलेले होते. अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंशतः कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठयात वाढ झाल्याने दि.३०/०४/२०१७ पासून नविन जलजोडणी मंजूरी सुरु करण्यात आलेली आहे.

पाणी ही जिवनाश्यक बाब असल्याने अनधिकृत इमारतीत राहत असलेले नागरिक पाण्याशिवाय राहू शकत नाही हे उघड सत्य आहे. त्यामुळे सदर नागरिक चोरुन नळजोडण्या घेतात वा ज्या नळजोडण्या शेजारी आहेत त्यावरुन पाण्याचा वापर करतात. त्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मिळणेसाठी मागणी होत आहे.

नविन नळजोडणी मंजूरी मा. स्थायी समिती सभा दि.१८/०१/२००३ ठराव क्र.९३ नुसार देण्यात येत. आहे. सदर धोरणात अनधिकृत बांधकामास नळजोडणी देणेबाबतची बाब समाविष्ट नव्हती. सदर धोरणात अंशतः बदल करण्यात येत असून अनधिकृत बांधकामास नळजोडणी देणेबाबत सुधारीत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांनी झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयाचा निवारा निश्चित करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना दि.०१/०१/१९९५ नंतर परंतु दि.०१/०१/२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत मालमत्ता अशा मिळकतींच्या संदर्भात नविन नळजोडणी मंजुर करणेकरीता कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण असणे आवश्यक आहे.

**अ) बहुमजली इमारत याकरीता बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नविन नळजोडणी मंजुरीसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे व अटीशर्तीची आवश्यकता राहील.**

१) स्ट्रक्चर / वास्तूचा फोटो

२) मालमत्ता कराची आकारणी

३) अनधिकृत बांधकाम सन २०११ पुर्वी अस्तित्वात असल्याचा पुरावा

४) अ) सदर नळजोडणी आरोग्याच्या व मानवतेच्या दृष्टीकोनातून दिलेली आहे. ब) सदर नळजोडणीमुळे अनधिकृत बांधकाम अधिकृत होणार नाही. क) सदर नळजोडणीमुळे चालू असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या कार्यवाहीला बाधा निर्माण होणार नाही. ड) अनधिकृत बांधकामावर कारवाई झाल्यास नळजोडणी मंजूरी आदेश रद्द समजण्यात येईल. अशा अटीशर्ती नळजोडणी मंजूरी आदेशात समाविष्ठ करण्यात याव्यात.

पाणीपट्टी भरणा केल्याने अनधिकृत बांधकाम हे अधिकृत होणार नाही व अनधिकृत बांधकामा विरुद्ध निष्काशनाची कायदेशीर कारवाई करणेस आमची हरकत नाही असे स्वतंत्र हमीपत्र अर्जदाराकडून लिहून घेणे.

बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना मा. स्थायी समिती सभा दि.२९/१२/२०१४ ठराव क्र.१०७ व मा. महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र.९३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार नविन नळजोडणी शुल्काच्या तीन पट दराने नळजोडणी शुल्काची आकारणी करणे. Chapter X Water Supply नियम ९ (१) प्रमाणे मा.स्थायी समिती यांना भाडे ठरविण्याचे अधिकार आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नियामवली, पाणीपट्टी व नविन नळजोडणी शुल्क आकारणी करणेस तसेच महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांनी झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची सशुल्क पुनर्वसन योग्य असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासीयाचा निवारा निश्चित करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी व्याप्त परिसरात झोपडी दि.०१/०१/२०११ अथवा त्यापूर्वीपासूनची असल्यास ग्रुप कनेक्शन मंजूर करावे व डिजिटल मिटर लावुन त्यांना स्वतंत्र नळ जोडणी मंजूर करावी तसेच एका इमारती मधील १५ सदनिका ऐवजी १० सदनिकांसाठी १ इंचाची १ नळ जोडणी देणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८५, **पाणी पुरवठा विभागाच्या वितर ण व्यवस्थेअंतर्गत देखभाल दुरुस्ती करीता मजूर पुरवठा करणे.**

**वर्षा भानुशाली :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वरील कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्थेअंतर्गत देखभाल दुरुस्ती करिता मजूर पुरवठा करणे. (निविदा - बी २)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **१) मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **रु. ७९२/- प्रति दिन/प्रति मजुर**<br>**वाटाघाटीनंतर रु. ७९२/- प्रति दिन/प्रति मजुर** |
| २) मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ८१९/- प्रति दिन/प्रति मजुर |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता **मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामाच्या निविदेला ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८५ :-**

**पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्थेअंतर्गत देखभाल दुरुस्ती करीता मजूर पुरवठा करणे**

**ठराव क्र. ७१ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वरील कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्थेअंतर्गत देखभाल दुरुस्ती करिता मजूर पुरवठा करणे. (निविदा - बी २)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **१) मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **रु. ७९२/- प्रति दिन/प्रति मजुर**<br>**वाटाघाटीनंतर रु. ७९२/- प्रति दिन/प्रति मजुर** |
| २) मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ८१९/- प्रति दिन/प्रति मजुर |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता **मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामाच्या निविदेला ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८६, **अनधिकृत बांधकाम तोडण्याकामी लागणा -या साहित्याच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**रवि व्यास :-**

मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना आरोग्य विभागातील कार्यादेशानुसार मागील सन २०१६-१७ या कालावधीपर्यंत वाहने व यंत्रसामुग्रीबाबत प्रभाग अधिकारी यांच्याकडे मागणी करुन साहीत्य उपलब्ध करुन घेत असल्याने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना देयक अदा करणे कामी येणा-या रू. ३७,२१,०१९/- इतक्या खर्चास ही सभा अर्थिक व प्रशाकिय मंजुरी देत आहे.

तसेच त्यापुढे अनधिकृत बांधकाम तोडण्या कामी लागणा-या साहित्या करीता निविदा प्रक्रिया करणे योग्य होते. व मुख्य लेखापरीक्षक यांनीही निविदा प्रक्रिया करणे बाबत सुचविले होते. परंतु तसे न करता मा. उपायुक्त (वाहन) यांनी वाहन विभागातील मंजूर दरानुसार वाहने व यंत्रसामृग्री घेणे बाबत सुचवून मे.सिताराम ट्रॅव्हल्स यांना वाहने व यंत्रसामृग्री पुरवठा करणे बाबत सविस्तर अहवाल सादर करून मा. मुख्य लेखा परीक्षक यांनी पुन्हा निविदा प्रक्रिया न करता संबंधित ठेकेदाराकडून वाहन व यंत्रसामृग्री पुरवठा करणे बाबत अभिप्राय दिला. दोन वेळा वेगवेग्ळा अभिप्राय दिला असल्याने प्रशासनाने खुलासा करून सदर कामाकरीता सुमारे १.५० ते २ कोटी ची आर्थिक व प्रशासकीय मूंजरी असल्याने सदर विषय मा. महासभे करीता शिफारस करीत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८६ :-**

**अनधिकृत बांधकाम तोडण्याकामी लागणा -या साहित्याच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७२ :-**

मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना आरोग्य विभागातील कार्यादेशानुसार मागील सन २०१६-१७ या कालावधीपर्यंत वाहने व यंत्रसामुग्रीबाबत प्रभाग अधिकारी यांच्याकडे मागणी करुन साहीत्य उपलब्ध करुन घेत असल्याने मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना देयक अदा करणे कामी येणा-या रू. ३७,२१,०१९/- इतक्या खर्चास ही सभा अर्थिक व प्रशाकिय मंजुरी देत आहे.

तसेच त्यापुढे अनधिकृत बांधकाम तोडण्या कामी लागणा-या साहित्या करीता निविदा प्रक्रिया करणे योग्य होते. व मुख्य लेखापरीक्षक यांनीही निविदा प्रक्रिया करणे बाबत सुचविले होते. परंतु तसे न करता मा. उपायुक्त (वाहन) यांनी वाहन विभागातील मंजूर दरानुसार वाहने व यंत्रसामृग्री घेणे बाबत सुचवून मे.सिताराम ट्रॅव्हल्स यांना वाहने व यंत्रसामृग्री पुरवठा करणे बाबत सविस्तर अहवाल सादर करून मा. मुख्य लेखा परीक्षक यांनी पुन्हा निविदा प्रक्रिया न करता संबंधित ठेकेदाराकडून वाहन व यंत्रसामृग्री पुरवठा करणे बाबत अभिप्राय दिला. दोन वेळा वेगवेग्ळा अभिप्राय दिला असल्याने प्रशासनाने खुलासा करून सदर कामाकरीता सुमारे १.५० ते २ कोटी ची आर्थिक व प्रशासकीय मूंजरी असल्याने सदर विषय मा. महासभे करीता शिफारस करीत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८७, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात मदतनीस (मजूर) म्हणून काम करणेस ठेका पध्दतीने ७० मदतनीस पुरविणेबाबत.**

**वंदना मंगेश पाटील :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेतील अग्निशमन विभाग हि अत्यावश्यक सेवा असुन नागरीकांच्या सुरक्षेस्तव सतत सुसज्ज असणे आवश्यक आहे. अग्निशमन विभागातील तुटपुंज्या कर्मचारी वर्गामुळे अग्निशमन विभागात मदतनीस (मजुर) म्हणुन काम करणेकरीता ठेका पध्दतीने ७० मदतनीस मिळणेकरीता मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. नागरीकांची सुविधा ही बाब विचाराधीन घेवुन मा. आयुक्त सो यांच्या तोंडी आदेशाचे पालन करीत सध्यस्थितीत कै. कल्पना चावला अग्निशमन स्थानक भाईदर (प.) व कनकिया अग्निशमन स्थानक ही दोन अग्निशमन स्थानके नव्याने कार्यान्वित करण्यात आली आहेत. परंतु तुटपुंज्या कर्मचारी वर्गामुळे कामकाज करणेस अडचणीचे होत आहे. तसेच लवकरच नवघर अग्निशमन स्थानक हे देखील कार्यान्वित करण्याचा अग्निशमन विभागाचा मानस आहे. त्यामुळे अग्निशमन विभागास मनुष्यबळाची नितांत आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाकरीता मदतनीस मिळणेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत एकुण ५ ठेकेदारांनी भाग घेतला होता. त्यापैकी केवळ २ ठेकेदार हे तांत्रिक लिफाफा चाचणीत पात्र ठरल्याने त्यांची दरपत्रके उघडलेल्या ठेकेदारांपैकी मे. जिनियस इन्फोटेक यांचे दर सर्वात कमी म्हणजेच प्रति दिन रु. ७१०/- इतका दर सादर केलेला होता. मे. जिनियस इन्फोटेक यांना निविदा समिती समोर वाटाघाटीस निमंत्रीत केले असता, त्यांनी वाटाघाटीअंती प्रति दिन रु. ६८१/- इतका दर सादर केला आहे. सदर दरानुसार प्रति माह (३० दिवस) रु. २०,४३०/- याप्रमाणे प्रत्येक मजुरास वेतन अदा करावे लागणार आहे. दरमहा प्रति मजुर रु. २०,४३०/- याप्रमाणे ७० मजुरांकरीता दरमहा रु. १४,३०,१००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता अग्निशमन विभागास ११ महिने करीता मजुर उपलब्ध झाल्यास सोयीचे ठरेल. अकरा महिन्याकरीता मजुर पुरवठा झाल्यास ७० मजुरांकरीता दरमहा रु. १४,३०,१००/- याप्रमाणे ११ महिन्यांकरीता एकुण रु. १,५७,३१,१००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात **अस्थायी आस्थापना/सुरक्षा रक्षक/वाहनचालक** या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २००.०० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली असुन चालु आर्थिक वर्षात झालेला वजा जाता आजमितीस रु. १३८.४६ लाख इतकी तरतुद शिल्लक आहे. माहे सप्टेंबर पासुन मजुर उपलब्ध झाल्यास माहे मार्च २०१९ पर्यतच्या कालावधीत म्हणजेच एकुण ७ महिन्यांकरीता रु. १,००,१०,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे व उर्वरित ४ महिन्यांकरीताच्या अपेक्षित खर्चाकरीता सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येईल.

तरी अग्निशमन विभागाची मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता ११ महिनेकरीता ठेका पध्दतीने मदतनीस पुरविणेकरीता मे. जिनियस इन्फोटेक यांना कार्यादेश प्रदान करणेस व सदर कामी येणा-या खर्चास रु. १,५७,३१,१००/- या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७३(क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय आपण मजूर पुरवठा ठेकेदारामार्फत करुन घेतो, संगणक चालक ठोक मानधनावर ठेवले आहेत. बरेच कर्मचारी आपण ठोक मानधनावर घेतो ह्यांना का घेत नाही. म्हणजे म्हणजे मधला माणूस कमी होतो. तुमचा रेव्हेन्यु लॉस कमी होईल ना. जो कोणी ठेकेदार आहे तो स्वतःचा फायदा असल्याशिवाय काम करणार नाही. मजूराला ६००-७०० रुपये ते देणार नाही. ठोक मानधनावर का घेत नाही. संगणक चालक १४०००-१५००० मध्ये आपल्याकडे काम करतात. ह्यांना आपण २०००० पगार देणार. अग्निशमनमध्ये मदतनीस ७० लोक म्हणजे मदतीला कर्मचारी. असुशिक्षित फायर डिपार्टमेंट अग्निशमन विभाग म्हणजे अति महत्वाचा विभाग. कुठली ट्रेनिंग नाही काही नाही. अशा लोकांना आपण कामावर ठेवणार का? आणि ठेकेदाराच्या माध्यमातून ठेवणार. ठोक मानधनावर का घेत नाही. २०००० पगारात तुम्हाला फायर डिपार्टमेंटची लोक भेटतील.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब ह्या सुचनेकडे लक्ष द्या. ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात मदतनीस (मजूर) म्हणून काम करणेस ठेका पध्दतीने ७० मदतनीस पुरविणेबाबत.**

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेतील अग्निशमन विभाग हि अत्यावश्यक सेवा असुन नागरीकांच्या सुरक्षेस्तव सतत सुसज्ज असणे आवश्यक आहे. अग्निशमन विभागातील तुटपुंज्या कर्मचारी वर्गामुळे अग्निशमन विभागात मदतनीस (मजुर) म्हणुन काम करणेकरीता ठेका पध्दतीने ७० मदतनीस मिळणेकरीता मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. नागरीकांची सुविधा ही बाब विचाराधीन घेवुन मा. आयुक्त सो यांच्या तोंडी आदेशाचे पालन करीत सध्यस्थितीत कै. कल्पना चावला अग्निशमन स्थानक भाईदर (प.) व कनकिया अग्निशमन स्थानक ही दोन अग्निशमन स्थानके नव्याने कार्यान्वित करण्यात आली आहेत. परंतु तुटपुंज्या कर्मचारी वर्गामुळे कामकाज करणेस अडचणीचे होत आहे. तसेच लवकरच नवघर अग्निशमन स्थानक हे देखील कार्यान्वित करण्याचा अग्निशमन विभागाचा मानस आहे. त्यामुळे अग्निशमन विभागास मनुष्यबळाची नितांत आवश्यक आहे.

अग्निशमन विभागाकरीता मदतनीस मिळणेकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत एकुण ५ ठेकेदारांनी भाग घेतला होता. त्यापैकी केवळ २ ठेकेदार हे तांत्रिक लिफाफा चाचणीत पात्र ठरल्याने त्यांची दरपत्रके उघडलेल्या ठेकेदारांपैकी मे. जिनियस इन्फोटेक यांचे दर सर्वात कमी म्हणजेच प्रति दिन रु. ७१०/- इतका दर सादर केलेला होता. मे. जिनियस इन्फोटेक यांना निविदा समिती समोर वाटाघाटीस निमंत्रीत केले असता, त्यांनी वाटाघाटीअंती प्रति दिन रु. ६८१/- इतका दर सादर केला आहे. सदर दरानुसार प्रति माह (३० दिवस) रु. २०,४३०/- याप्रमाणे प्रत्येक मजुरास वेतन अदा करावे लागणार आहे. दरमहा प्रति मजुर रु. २०,४३०/- याप्रमाणे ७० मजुरांकरीता दरमहा रु. १४,३०,१००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता अग्निशमन विभागास ११ महिने करीता मजुर उपलब्ध झाल्यास सोयीचे ठरेल. अकरा महिन्याकरीता मजुर पुरवठा झाल्यास ७० मजुरांकरीता दरमहा रु. १४,३०,१००/- याप्रमाणे ११ महिन्यांकरीता एकुण रु. १,५७,३१,१००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात **अस्थायी आस्थापना/सुरक्षा रक्षक/वाहनचालक** या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २००.०० लाख इतकी तरतुद करण्यात आलेली असुन चालु आर्थिक वर्षात झालेला वजा जाता आजमितीस रु. १३८.४६ लाख इतकी तरतुद शिल्लक आहे. माहे सप्टेंबर पासुन मजुर उपलब्ध झाल्यास माहे मार्च २०१९ पर्यतच्या कालावधीत म्हणजेच एकुण ७ महिन्यांकरीता रु. १,००,१०,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे व उर्वरित ४ महिन्यांकरीताच्या अपेक्षित खर्चाकरीता सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येईल.

तरी अग्निशमन विभागाची मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता ११ महिनेकरीता ठेका पध्दतीने मदतनीस पुरविणेकरीता मे. जिनियस इन्फोटेक यांना कार्यादेश प्रदान करणेस व सदर कामी येणा-या खर्चास रु. १,५७,३१,१००/- या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७३(क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वंदना मंगेश पाटील अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८८, **महानगरपालिकेचे विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकामी निविदा पुन्हा विचारार्थ सादर करणेबाबत.**

**मेघना रावल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेच्या विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करुन महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यास नागरिकांना विविध विभागांची माहिती उपलब्ध करणे सोयीचे होईल. महापालिकेच्या विविध आज्ञावलीशी सदर अभिलेख जोडल्यास नागरिकांना विविध सेवा त्वरीत उपलब्ध करणे शक्य होईल. आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास या अभिलेखाचा महानगरपालिकेस

उपयोग होईल. त्याप्रमाणे भाईंदर महानगरपालिका विभागामार्फत प्राप्त झालेले अंदाजित दस्तावेज व पुढील वर्षातील चालू अभिलेख **Scanning and digitization** करणेकामी ५ वर्ष कालावधीकरिता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१०/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या.

उपरोक्त प्रस्तावाचा प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार तुलनात्मक तक्ता पाहता व वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास व कमी दर असलेल्या निविदाधारक **M/s.Genius Infotech** यांना ५ वर्ष कालावधीकरिता महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73**(क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८८ :-**

**महानगरपालिकेचे विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकामी निविदा पुन्हा विचारार्थ सादर करणेबाबत.**

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेच्या विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करुन महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यास नागरिकांना विविध विभागांची माहिती उपलब्ध करणे सोयीचे होईल. महापालिकेच्या विविध आज्ञावलीशी सदर अभिलेख जोडल्यास नागरिकांना विविध सेवा त्वरीत उपलब्ध करणे शक्य होईल. आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास या अभिलेखाचा महानगरपालिकेस उपयोग होईल. त्याप्रमाणे भाईंदर महानगरपालिका विभागामार्फत प्राप्त झालेले अंदाजित दस्तावेज व पुढील वर्षातील चालू अभिलेख **Scanning and digitization** करणेकामी ५ वर्ष कालावधीकरिता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१६/१०/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या.

उपरोक्त प्रस्तावाचा प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार तुलनात्मक तक्ता पाहता व वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरास व कमी दर असलेल्या निविदाधारक **M/s.Genius Infotech** यांना ५ वर्ष कालावधीकरिता महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73**(क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. मेघना रावल    अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८९, **वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता एक फिरता दवाखाना व दोन शववाहिनी खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

उपरोक्त विषयान्वये वैदयकिय आरोग्य विभागाअंतर्गत काशिगांव विभागात फिरता दवाखाना सुरु होता. काशिगांव कार्यक्षेत्रातील पाडे, वाडया, झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी बाहयरुग्ण सेवा या फिरत्या दवाखान्या मार्फत पुरविण्यात येत असे. परंतू दवाखान्याचे वाहन निकामी झाल्याने निर्लेखित करण्यात आले आहे. त्यामुळे पाडे, वाडया इत्यादी ठिकाणी रुग्णसेवा पूरविता येत नाही. सदर कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या व मा. नगरसेवकाच्या फिरता दवाखाना सुरू करणे बाबत मागणी येत आहे.

तसेच वैद्यकिय आरोग्य विभागा अंतर्गत सध्या ३ शववाहिनी कार्यरत असुन सदर ३ ही वाहने ११ ते १२ वर्षे जुनी असुन सदरची वाहने वेळोवेळी नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे पदाधिकारी, नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या करीता २ शववाहिनी व १ फिरता दवाखाना खरेदी केल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेला महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना रुग्णसेवा देणे शक्य होईल. याबाबत वैदयकिय आरोग्य अधिकारी यांनी वरील संदर्भान्वये कळविले आहे.
सदर वाहने खरेदी करण्याकरीता वैद्यकिय आरोग्य विभागा अंतर्गत सन २०१८-१९ या अर्थसंकल्पात रु.४०.०० लाख इतकी तरतदु करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन वरील वाहने खरेदी करणे योग्य होईल.

महापालिकेकरिता शासकिय दराने वाहने खरेदी करावयाची आहेत. सदर खरेदी करिता DGS&D चे रेट कॉन्ट्रॅक्ट उपलब्ध नाही. परंतू शासकिय कार्यालयाकरिता GeM Government e Marketplace या वेबसाईटवरून मे.टाटा मोटर्स कंपनीकडून 3488mm Wb Dual ac,PS, Dual alt, dual battry, टाटा विंगर्स रुग्णवाहिका/शववाहिनी खरेदी करणेकामी प्रती वाहन रु.१०,७८,६२०/- स्टिकरिंग करिता रु. ८७६०/- (जीएसटी सह) असे एकूण प्रती वाहन रु. १०,८७,३८०/- इतका खर्च अपेक्षित असून ३ वाहनांसाठी रु. ३२,६२,१४०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त मॉडलचे वाहन GeM Government e Marketplace या वेबसाईटवरुन शासकिय दरानुसार एक फिरता दवाखाना व दोन शववाहिनी थेट खरेदी करणेस ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**वर्षा भानुशाली :-**

मी २०१५-१६ मध्ये माझा नगरसेवक निधी दिला होता. ते करतो करतो असे सांगितले आणि ते केलेच नाही. आणि परत हा विषय आणला. मा. महापौर डिम्पल मेहता, निलम ढवण, वंदना पाटील आम्ही ज्यावेळेला नगरसेवक निधी देत होतो ५ नगरसेवक होते. आमचा निधी लॅब्स झाला. आतापर्यंत आमची पुन्हा निवडणूक झाली. परत आम्ही आले आणि आम्ही ते करत होतो.

**मा. सभापती :-**

भोपतराव साहेब वाहन तुमच्याकडे आहे ना. म्हसाळ साहेब तुम्ही बघून घ्या आणि पॉसिबल असेल तर ह्यांच्या निधीमधून करुन घ्या. म्हणजे आपले महापालिकेचे पैसे वाचतील.

**जुबेर इनामदार :-**

निधी लॅब्स झाला ना.

**वर्षा भानुशाली :-**

तुम्ही सादर करुन करतो करतो हा प्रॉब्लेम आहे ना. आता ते मगणी करते.

**वंदना पाटील :-**

मान्यता आली नाही.

**वर्षा भानुशाली :-**

आम्ही नगरसेवक निधी देत होते त्यावेळी त्या लोकांनी काय केले.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब विषय फॉलो अप कोण करत होते का?

**वर्षा भानुशाली :-**

आम्ही पूर्ण फॉलोअप केले.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब आज नाहीत. वाहन विभाग म्हसाळ साहेबांकडे होता म्हणून मी त्यांना सांगितले.

**वर्षा भानुशाली :-**

आमच्या पाच लोकांचा निधी लॅब्स झाला. आम्ही नगरसेवक आहेत. आता मागणी करतात म्हणजे ती पण नुकसानी झाली आणि लोकांना सुखसुविधा भेटल्या नाही. मागणी तिथेच राहीली. असा प्रकार करायचा असेल तर त्यांना द्यायलाच नाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

पूढच्या वेळेला पाणपट्टे साहेब आले की आपण विचारु. ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ८९ :-**

**वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता एक फिरता दवाखाना व दोन शववाहिनी खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७५ :-**

उपरोक्त विषयान्वये वैदयकिय आरोग्य विभागाअंतर्गत काशिगांव विभागात फिरता दवाखाना सुरु होता. काशिगांव कार्यक्षेत्रातील पाडे, वाडया, झोपडपट्टी इत्यादी ठिकाणी बाहयरुग्ण सेवा या फिरत्या दवाखान्या मार्फत पुरविण्यात येत असे. परंतू दवाखान्याचे वाहन निकामी झाल्याने निर्लेखित करण्यात आले आहे. त्यामुळे पाडे, वाडया इत्यादी ठिकाणी रुग्णसेवा पूरविता येत नाही. सदर कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या व मा. नगरसेवकाच्या फिरता दवाखाना सुरू करणे बाबत मागणी येत आहे.

तसेच वैद्यकिय आरोग्य विभागा अंतर्गत सध्या ३ शववाहिनी कार्यरत असुन सदर ३ ही वाहने ११ ते १२ वर्षे जुनी असुन सदरची वाहने वेळोवेळी नादुरुस्त होत आहेत. त्यामुळे पदाधिकारी, नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या करीता २ शववाहिनी व १ फिरता दवाखाना खरेदी केल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेला महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना रुग्णसेवा देणे शक्य होईल. याबाबत वैदयकिय आरोग्य अधिकारी यांनी वरील संदर्भान्वये कळविले आहे.

सदर वाहने खरेदी करण्याकरीता वैद्यकिय आरोग्य विभागा अंतर्गत सन २०१८-१९ या अर्थसंकल्पात रु.४०.०० लाख इतकी तरतदु करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन वरील वाहने खरेदी करणे योग्य होईल.

महापालिकेकरिता शासकिय दराने वाहने खरेदी करावयाची आहेत. सदर खरेदी करिता DGS&D चे रेट कॉन्ट्रॅक्ट उपलब्ध नाही. परंतू शासकिय कार्यालयाकरिता GeM Government e Marketplace या वेबसाईटवरून मे.टाटा मोटर्स कंपनीकडून 3488mm Wb Dual ac,PS, Dual alt, dual battry, टाटा विंगर्स रुग्णवाहिका/शववाहिनी खरेदी करणेकामी प्रती वाहन रु.१०,७८,६२०/- स्टिकरिंग करिता रु. ८७६०/- (जीएसटी सह) असे एकूण प्रती वाहन रु. १०,८७,३८०/- इतका खर्च अपेक्षित असून ३ वाहनांसाठी रु. ३२,६२,१४०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त मॉडलचे वाहन GeM Government e Marketplace या वेबसाईटवरुन शासकिय दरानुसार एक फिरता दवाखाना व दोन शववाहिनी थेट खरेदी करणेस ही सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९०, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामाचे देयक प्रदानास व मुदतवाढीस मंजूरी देणेबाबत.**

**अनिल विराणी :-**

वरील गोषवारा पाहता प्रशासनाने सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिलेली आहे. या ४ वर्षात कोणत्या जाचक अटीमुळे ठेकेदाराने निविदा भरल्या नाहीत याचा खुलासा करावा. तसेच जर ४ वर्षात निविदा जाचक अटीमुळे कुणी भरत नव्हते तर त्या बाबत प्रशासनाने मा. स्थायी समिती अथवा मा. महासभे समोर ठेवुन त्यातील अटी का शिथील केल्या नाहीत, याबाबत खुलासा करणे गरजेचे असल्याने सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामाचे देयक प्रदानास व मुदतवाढीस मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ७६ :-**

वरील गोषवारा पाहता प्रशासनाने सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिलेली आहे. या ४ वर्षात कोणत्या जाचक अटीमुळे ठेकेदाराने निविदा भरल्या नाहीत याचा खुलासा करावा. तसेच जर ४ वर्षात निविदा जाचक अटीमुळे कुणी भरत नव्हते तर त्या बाबत प्रशासनाने मा. स्थायी समिती अथवा मा. महासभे समोर ठेवुन त्यातील अटी का शिथील केल्या नाहीत, याबाबत खुलासा करणे गरजेचे असल्याने सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी          अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, **महानगरपालिकेच्या विवीध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.**

**मा. सभापती :-**

हा विषय दिला होता त्याचे टेंडर ओपनिंग केल्यानंरत जो मिनीमम वेजेस ॲक्टचा जो कॉलम आहे. त्याच्यामध्ये क्लेरीफिकेशन व्हायचे बाकी आहे. म्हणून महापालिकेनी कामगार आयुक्तांना पत्र दिले आहे. क्लेरिफिकेशन झाल्यावर विषय क्र. ९१ आणि विषय क्र. १०४ परिवहन उपक्रम हे दोन विषय आपण पेंडींग ठेवू या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२, **मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता आरक्षण क्र . 326-अ येथे विकसीत होत असलेल्या घोडबंदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारणेकरिता प्राप्त देकार स्विकारणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ (घोडबंदर) येथे बस डेपो विकसित करण्यात येत आहे. सदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेस मा. महासभा ठराव क्र.३१ दि. १९-०६-२०१७ व ठराव क्र. २३ दि. ०८-११-२०१७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर कामी Request For Expressions of interest (REOI) प्रसिध्द करणेस मा. आयुक्त यांनी दि. ०५-०१-२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/परिवहन/२९३/२०१७-१८ दि. ०९-०१-२०१८ अन्वये REOI प्रसिध्द करून देकार (Offer) मागविण्यात आले होते. मुदतीत दि. २३-२-२०१८ पर्यंत १) मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. २) मे. अदनानएक्सपोर्टस एण्ड इम्पोर्टस या दोन देकार (Offer) प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त देकारांमध्ये मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेशी वेळोवेळी सल्लागार व अधिकारी यांनी चर्चा करण्यात आली आहे. तसेच मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडून Email द्वारे सादर केलेले सुधारीत प्रस्ताव व स्पष्टीकरण विचारात घेवून मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. हे Eligible Criteria मध्ये पात्र आहेत. मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडे Retail Outlet करीता विचारणा करण्यात आली होती. तथापि, घोडबंदर बस डेपो येथे Retail Outlet Suitable होत नाही. त्यामुळे मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे Consumer Pump करीता आलेला सुधारित देकार (Offer) स्विकारणे योग्य आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. | Name of the | Discounr per liter | Additional discount perliter in Rs. | GST | Trasporta | Payment |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **No .** | **firm** | **average in Rs.** | | | **tion Charges** | **Terms** |
| **1.** | **Bharat Petroleum Corporation Ltd.** | **2.30 (1.99 to 2.62)** | **0.25 for Annual consumption upto 4000KL andRs.0.35 for 4000KL** | **Nil** | **Nil** | **One day credit** |

घोडबंदर बस डेपो येथे डिझेल पंप उभारणेसाठी मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वरीलप्रमाणे सुधारीत देकार स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९२ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता आरक्षण क्र . 326-अ येथे विकसीत होत असलेल्या घोडबंदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारणेकरिता प्राप्त देकार स्विकारणेस मंजुरी मिळणेबाबत**

**ठराव क्र. ७७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. ३२६-अ (घोडबंदर) येथे बस डेपो विकसित करण्यात येत आहे. सदर बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता देकार मागविणेस मा. महासभा ठराव क्र.३१ दि. १९-०६-२०१७ व ठराव क्र. २३ दि. ०८-११-२०१७ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदर कामी Request For Expressions of interest (REOI) प्रसिध्द करणेस मा. आयुक्त यांनी दि. ०५-०१-२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/परिवहन/२९३/२०१७-१८ दि. ०९-०१-२०१८ अन्वये REOI प्रसिध्द करून देकार (Offer) मागविण्यात आले होते. मुदतीत दि. २३-२-२०१८ पर्यंत १) मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. २) मे. अदनानएक्सपोर्टस एण्ड इम्पोर्टस या दोन देकार (Offer) प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त देकारांमध्ये मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेशी वेळोवेळी सल्लागार व अधिकारी यांनी चर्चा करण्यात आली आहे. तसेच मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडून Email द्वारे सादर केलेले सुधारीत प्रस्ताव व स्पष्टीकरण विचारात घेवून मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. हे Eligible Criteria मध्ये पात्र आहेत. मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचेकडे Retail Outlet करीता विचारणा करण्यात आली होती. तथापि, घोडबंदर बस डेपो येथे Retail Outlet Suitable होत नाही. त्यामुळे मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे Consumer Pump करीता आलेला सुधारित देकार (Offer) स्विकारणे योग्य आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No . | Name of the firm | Discounr per liter average in Rs. | Additional discount perliter in Rs. | GST | Trasport ation Charges | Payment Terms |
|---|---|---|---|---|---|---|
| **1.** | **Bharat Petroleum Corporation Ltd.** | **2.30 (1.99 to 2.62)** | **0.25 for Annual consumption upto 4000KL andRs.0.35 for 4000KL** | **Nil** | **Nil** | **One day credit** |

घोडबंदर बस डेपो येथे डिझेल पंप उभारणेसाठी मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांचे वरीलप्रमाणे सुधारीत देकार स्विकारणेस ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, **मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रामध्ये विवीध ठिकाणी आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही. पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वीत करणे (प्रभाग निधी) कामीच्या निवीदेस मंजुरी देणेबाबत.**

**मेघना रावल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे (प्रभाग निधी) कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत उपरोक्त संदर्भ नोटीस अन्वये ऑनलाईन निविदा, दोन मुदतवाढी व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त पात्र निविदा धारकाचा दराचा लिफाफा उघडला असता मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस यांनी सादर केलेले दर सर्वात कमी होते. प्राप्त दरांमध्ये दि. ०९/०७/२०१८ रोजी मा. निविदा समिती समोर वाटाघाटी करण्यात आल्या. त्यामध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे

**A. Consolidated Cost Summary (Inclusive of all taxes except GST)**

| Sr. No. | Particulars | Krystal Integrated Services | |
|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1. | Supply, Installation and commissioning of CCTV and other components as and when required in MBMC Area. (Prabhag Nidhi) | Rs. 26,29,241/- | Rs. 22,53,725/- |

B. Breakup of Consolidated Cost Summary

| Sr. No. | Description | Krystal Integrated Services | | |
|---|---|---|---|---|
| | | Make and Model | Quoted Rates | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1 | 3MP 30 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA ACCESSORIES as per tender specification | Hikvision | Rs. 5303 | Rs. 5303 |
| 2 | 3MP 50 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | Hikvision | Rs. 12915 | Rs.12915 |
| 3 | Supply and Installation for 4 channel NVR | Hikvision | Rs. 13073 | Rs. 7270 |
| 4 | Supply and Installation for 8 channel NVR | Hikvision | Rs. 50243 | Rs. 9950 |
| 5 | Supply and Installation for 16 channel NVR | Hikvision | Rs. 79275 | Rs. 21500 |
| 6 | Supply and Installation for 32 channel NVR | Hikvision | Rs. 86100 | Rs. 44670 |
| 7 | 1KM 5.8GHz wireless bridge outdoor type IP66 | SCORPION F300 | Rs. 56700 | Rs.44093 |
| 8 | Video Management Software with license for 150 cameras recording, viewing and playback capability as per tender specifications. | Hikcentral - VSS- 1 Channel | Rs. 1733 | Rs.1733 |
| 9 | Supply and Installation 4 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 7718 | Rs.7718 |
| 10 | Supply and Installation 6 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 12233 | Rs.12233 |
| 11 | Supply and Installation 8 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 17220 | Rs. 17220 |
| 12 | Network Video Server with keyboard, mouse, monitor, HDD storage hardware & required software, with its accessories as per tender specifications. | Lenovo / HP | Rs. 548543 | Rs. 548543 |
| 13 | Client Work Station for Viewing with its accessories as per tender specifications. | Lenovo / HP | Rs. 78411 | Rs. 78411 |
| 14 | Storage device having capacity to store 30 days recording of 150 cameras each of 3MP resolution at 25FPS | Lenovo / HP | Rs. 1126560 | Rs. 1126560 |
| 15 | Supply and Installation for Monitor - LCD 20" Monitor as per tender specifications. | Samsung B2030 | Rs. 8768 | Rs. 8768 |
| 16 | Supply and Installation for Monitor - LCD 32" Monitor as per tender specifications. | Samsung HG32AE460 | Rs. 19268 | Rs. 19268 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 17 | 24+4 PORT ETHERNET POE SWITCH with its accessories as per tender specifications. | Allied Telesis AT-x930-28GPX-N1-00 | Rs. 257573 | Rs. 43067 |
| 18 | 8 port gigabit LAN switch | Allied Telesis AT-GS950/8 | Rs. 11697 | Rs. 11697 |
| 19 | CAT 6e ETHERNET cable with necessary PVC Conduits, fixtures & junction box as required as per tender specifications. Supply of conduit, fixtures and junction boxes are in cope of vendor. | Dlink NCB-C6UGRYR - 305 | Rs. 66 | Rs. 66 |
| 20 | POLES FOR MOUNTING THE CAMERAS with its accessories as per tender specifications. | OEM | Rs. 11025 | Rs. 11025 |
| 21 | Outdoor weatherproof junction boxes pole mounted with MCB, POE injector, cameras power supply or POE source and surge protectors required for wireless antennas | OEM | Rs. 9450 | Rs. 9450 |
| 22 | Lightening arrestors on poles for protection | OEM | Rs. 1890 | Rs. 1890 |
| 23 | 21UX600MM WX800MM D RACK for Viewing Station with its accessories wheel etc. as per tender specifications. | Valrack 22U | Rs. 20475 | Rs. 20475 |
| 24 | Installation, Testing & Commissioning of the system. Laying & Termination of Power And Data Cables etc. | OEM | Rs. 630 | Rs. 630 |
| 25 | Supply and Installation for 4U DVR Rake | Valrack 4U | Rs. 3728 | Rs. 3728 |
| 26 | Supplying and fixing 6U Wall Mount Rack (Dimension-DxWXH - 450X550X367 mm) | Valrack 6U | Rs. 4043 | Rs. 4043 |
| 27 | Sector Antenna 5G, Gain 47dbi, or as per actual site requirement | OEM Mikrotik | Rs. 12600 | Rs. 12600 |
| | **Grand total in Figures (T)** | | **Rs. 2457240** | **Rs. 2006134** |

C. AMC

| Sr. No. | Particulars | Krystal Integrated Services | |
|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1. | Comprehensive Maintenance for Second Year | Rs.73717 | Rs.73717 |
| 2. | Comprehensive Maintenance for Third Year | Rs.98289 | Rs.80000 |
| **Grand total in Figures (T)** | | **Rs.172006** | **Rs.153717** |

वरील कामाकरीता वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे

**जुबेर इनामदार :-**

कुठली प्रभाग निधी.

**अनिता पाटील :-**

प्रभाग निधी कोणाची देण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

पुराना निधी है, अभी मंजुरी के लिए आया है।

**वर्षा भानुशाली :-**

आमचा पण जुना निधी आहे तर आमची पण मंजुरी घ्या.

**मा. सभापती :-**

हा विषय आपल्याकडे प्रशासनाकडून येतो. जे टेंडर एकदा मंजुरीला आले ते ओपन झाले एक्झाम्पल मागच्या नगरसेवकानी दिले असेल. त्याला जर वेळ लागला एकदा, दोनदा, तिनदा टेंडर रि-कॉल होते. त्याच्यानंतर जेव्हा येते त्यानंतर ते मंजूरीला येते.

**वर्षा भानुशाली :-**

कुठल्या वर्षाचे काम पेन्डींग आहे.

**मा. सभापती :-**

मागच्या टर्मची आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोणाची आहे.

**मा. सभापती :-**

चार सदस्य आहेत.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहेब आमचे पण हेच प्रकरण घडलेले होते.

**दिप्ती भट :-**

टेंडर दोनदा निघाले मग ते राहिले.

**मा. सभापती :-**

त्याच्यामुळे हे लेट झाले.

**वर्षा भानुशाली :-**

आमचे पण तेच प्रकरण आहे. अधिकाऱ्यांनी नीट फॉलो अप केले नाही त्याच्यामुळे आमचा निधी लॅब्स झाला.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब येतील तेव्हा त्यांना आपण विचारु या.

**वर्षा भानुशाली :-**

ते पण घ्या.

**जुबेर इनामदार :-**

ऑडिटर साहेबांनी सांगावे. मा. सभापती साहेब ऑडिटर साहेबांनी स्पष्टीकरण द्यावे. कुठल्या वर्षाचा निधी केव्हा वापरता येईल.

**मा. सभापती :-**

त्यांनी निधी वापरला. एक्झाम्पल माझा निधी आहे. मी प्रशासनाला पत्र दिले की माझ्या निधीमधून इथे सी.सी.टी.व्ही बांधणे किंवा शाळा बांधणे. त्यानंतर प्रशासन त्याच्यावर इस्टीमेट बनवते. वर्किंग करते नोट पूटअप करते, टेंडर मागवते, टेंडर कोणी भरले नाही तर १,२,३ वेळा रिकॉल करते. ह्या प्रोसेसला कमीत कमी १ ते दीड वर्ष लागते. कधी जास्त पण लागते त्यानंतर ते प्रपोजल पूट अप होते.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक वर्षामध्ये कमीत कमी कार्यादेश जरी दिला असता आणि तो खर्च त्यांनी समजा त्यांनी देयक अदा दुसऱ्या वर्षामध्ये झाले तर तो गृहित धरु शकतो. इथे त्याचे काहीच झाले नाही. वर्ष संपले म्हणजे ती निधी लॅब्स होते. आजपर्यंत असाच इतिहास आहे. आमचे गेल्या वर्षीचे बाकी आहेत. आम्हाला दिले नाही.

**मा. सभापती :-**

गिते साहेब असताना त्यांनी सदरचे प्रपोजल दिले होते गिते साहेबांनी ते डिले केले. अगोदर सॅक्शन झाले होते त्याची मंजूरी पण झाली होती. प्रोसेस तुम्हाला माहित आहे की तुम्हाला प्रभाग समितीचे काम करायचे असेल किंवा नगरसेवकांचे काम करायचे असेल तुम्ही महापालिकेमध्ये इंजिनिअरला पत्र देतात त्याप्रमाणे इंजिनिअर बनवतो. आणि प्रभाग निधी असेल तर प्रभाग समितीपूढे सादर होते. प्रभाग समितीपूढे सादर झाल्यावर प्रभाग समिती त्याला मंजूरी देते. मंजूरी दिल्यानंतर त्याची टिप्पणी होते. त्याप्रमाणे इंजिनिअर त्याच्यावर कारवाई करतो. निविदा काढतो. त्याची प्रोसेस आयुक्तांच्या मंजूरीने होते. आयुक्तांच्या मंजूरीला थोडासा वेळ लागला. वेळ लागल्यामुळे हे टेंडर लेट निघाले. टेंडर निघाल्यानंतर २-३ वेळा रिकॉल झाले. मध्यंतरी इलेक्शन लागले आणि आचारसंहिता आली. त्यानंतर ह्या लोकांनी फॉलो अप केले.

**जुबेर इनामदार :-**

आपल्या अर्थसंकल्पामध्ये प्रलंबित नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी अशी तरतूद कुठे आहे. जी तरतूद अर्थसंकल्पामध्ये नाही त्याचे काम आम्ही कसे करु शकतो. आयुक्त महोदय आम्हाला त्याचे स्पष्टीकरण द्या असे शक्य आहे का? आमचे बाकी आहेत मग आम्हीही तुमच्यासमोर प्रस्ताव ठेवतो.

**मा. सभापती :-**

हा प्रस्ताव ऑलरेडी मंजूर झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे पण त्याचे कार्यादेश देण्यात आलेले नाहीत.

**मा. सभापती :-**

तुमचा प्रस्ताव प्रभाग समितीपूढे आलाच नाही. त्याच्यामुळे ते झाले नाही.

**जुबेर इनामदार :-**

देयक अदा करायचा विषय येतो तेव्हा स्पिल ओव्हर होते.

**मा. सभापती :-**

ह्या आर्थिक वर्षामध्ये आपण नगरसेवक निधी प्रभाग निधी जो काही निधी आहे तो आपण वापरतो. आणि ह्या प्रोसेसमध्ये लेट झाले आणि आपले ३१ मार्च होऊन गेले तर तो जो बॅलेन्स आहे ना तो आपण पूढच्या वर्षीच्या निधीमध्ये कॅरी फॉरवर्ड करतो. कॅरी फॉरवर्ड करत नाही तो तरतुदीमध्ये टाकतो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्या बजेटमध्ये प्रभाग निधीची तरतूद करण्यात आलेली त्या तरतुदीमधून हे खर्च करणार आहेत का? नाही करणार तर तुमच्याकडे अर्थसंकल्पामध्ये तरतूद नाही ऑडिटरने हा विषय सांगावा.

**मा. सभापती :-**

तरतूद रजिस्टरला जोपर्यंत पडत नाही. तोपर्यंत निविदा निघत नाही आणि निविदा निघाल्यानंतर निविदा तरतुदीप्रमाणे निधी.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय तुमच्याकडून ही अपेक्षा नाही. अर्थव्यवस्थेमध्ये असे प्रोव्हीजन कुठे आहे की ज्या वर्षामध्ये खर्च पडला नाही तर दुसऱ्या वर्षामध्ये करायचा. एकदा आर्थिक वर्ष संपले की जी तुमची......

**मा. सभापती :-**

ऑडिटर साहेब तुमचे क्लेरिफिकेशन करा.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब आम्ही दिलेले तुम्हाला लेटर आहे........

**मा. सभापती :-**

दोन गोष्टी वेगळ्या आहेत. तुमचा जो निधी आहे तुमच्या सांगण्याप्रमाणे लॅब्स झाला.

**वर्षा भानुशाली :-**

लॅब्स झाला नाही. गिते साहेब लास्टपर्यंत सांगत होते की करुन देतो. ही अडचण येते ती अडचण येते. आम्हाला शब्द देऊन गेले. आता कमिशनर एवढे चेंज झाले आहेत की आम्ही पण गप्प बसलो.

**मा. सभापती :-**

गिते साहेबांनंतर पवार साहेब आले, त्यानंतर खतगावकर साहेब आले.

**वर्षा भानुशाली :-**

आमची विनंती आहे की खूप गरजेचे काम आहे हे होऊ शकते तर ते पण होऊ शकते.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. तुमचे जे काय आहे ते पानपट्टे साहेब आल्यावर क्लेरिफिकेशन करु.

**वर्षा भानुशाली :-**

आमचा विषय स्टॅन्डिंगमध्ये लवकर आणा.

**मा. सभापती :-**

ऑडिटर साहेब हा जो विषय आहे तो स्थायी सदस्यांनी त्याच्या प्रभाग निधीमधून रेकमेन्ड केला होता आणि रेकमेन्ड केल्यानंतर त्या तरतुद रजिस्टरमध्ये तरतुदीप्रमाणे रेकमेन्ड केला. त्यानंतर ते प्रपोजल पुटअप झाले. त्यानंतर आयुक्तांनी लेट केले त्यानंतर टेंडर लेट निघाले. त्यानंतर २-३ वेळा रिकॉल झाले ते टेंडर आता ओपन झाले. ते आता मंजुरीकरिता आले आहे.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहेब आमचा विषय स्टॅन्डिंगपर्यंत येऊन गेला आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय चालू असताना दुसरा विषय नाही घ्यायला पाहिजे.

**वर्षा भानुशाली :-**

साहेब असे नाही. विषय आला त्या संदर्भातच आम्ही बोलले.

**मा. सभापती :-**

वर्षा मॅडम तुमचा विषय पानपट्टे साहेबांकडे आहे ते आल्यानंतर बोलू. संपूर्ण माहिती घ्या आणि पानपट्टे साहेब आल्यावर ती माहिती देऊ. त्याच्या मिटींगची तुम्ही वाट बघू नका. जुबेर साहेबांचे म्हणणे आहे की फायनान्शीयल वर्ष संपलेले आहे. आता तुम्ही काय करणार जशी आपली सिस्टम आहे त्या सिस्टमप्रमाणे ज्यावेळी आपला खर्च पडेल आणि एक्झीस्टींग प्रभाग निधी द्यायला लागेल. कारण ९५ नगरसेवकांचे प्रभाग निधी खर्च करत नाही आणि जरी आपण केले तरी ती काम कधी कधी लेट होतात. पुढच्या आर्थिक वर्षामध्ये कॅरी फॉवरवर्ड करतो अशी महापालिकेची सिस्टम आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोणत्या वर्षाचा निधी आहे त्याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. एकदा प्रभाग निधी किंवा नगरसेवक निधी त्या आर्थिक वर्षामध्ये त्याचा वापर केला गेला नाही तर ते पुढच्या वर्षामध्ये स्पिल ओव्हर केला जातो का? त्याचा वेगळा लेखाशिर्ष तयार करुन करायला लागेल. ज्या वर्षाची नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी आहे ती त्या वर्षामध्येच खर्च केली पाहिजे. ह्या वर्षाची नगरसेवक निधी आणि प्रभाग निधीची तरतूद करण्यात आली आहे. ऑडिटर साहेब असे करता येईल का? २०१७-१८ चा निधी २०१८-१९ मध्ये खर्च करु शकतो का?

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय मला ह्याच्यामध्ये एवढेच भाष्य करता येईल जो समोर प्रस्ताव आहे तो आयटम रेटच्या मंजूरीचा आहे असे मला दिसते. आणि त्याच्यामध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीमधला कोणताही निधी आयटम रेटला मंजुरी मिळाल्यावर वापरता येईल पण प्रस्तावित निधी कुठला आहे ते डिपार्टमेंट सांगू शकेल.

**मा. सभापती :-**

ऑडिटर साहेबांनी त्याची बाजू सांगितली कुठल्या वर्षाचे ते डिपार्टमेंट सांगेल.

**जुबेर इनामदार :-**

डिपार्टमेंटनी सांगावे त्यांनी प्रस्ताव दिला आहे त्यांनी सांगावे कुठल्या वर्षाचे आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सन २०१६-१७ आणि २०१७-१८ हे कन्टीन्यूअस निविदा काढत होते. कोण निविदा भरत नव्हते त्यामुळे जे अंदाजपत्रक बनवले होते ते त्या वर्षाचे निधी बघून अंदाजपत्रक बनवले होते. आचारसंहिता किंवा अन्य कारणामुळे निविदामुळे प्रोसेस करता आली नाही. नंतर त्या निविदा निघाल्या आहेत. २०१६-१७ मध्ये सन्मा. नगरसेविका मेघना रावल आणि दिप्ती भट ह्यांच्याकडचे आहे आणि उर्वरीत प्रस्ताव २०१७-१८ मधले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

२०१६-१७ चा निधी २०१७-१८ मध्ये ह्याचा वापर होऊ शकतो का? तुम्हाला खर्च करायला तरतूद लागते पालिकेचे काम वारंवार चालू शकत नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ह्याच्यात रिॲप्रोप्रिएशन करायला लागेल. खर्च झालेला नाही.

**जुबेर इनामदार :-**

आयची २०१६-१७ ची प्रभाग निधी, नगरसेवक निधी बाकी आहे. सर्वांची रिॲप्रोप्रिएशन करा आणि हा मंजूर करा.

**मा. सभापती :-**

ज्या सदस्यांचा प्रभाग निधी होता त्या सदस्यांनी तो प्रभाग निधी पूट अप केला. त्याप्रमाणे संबंधित विभागाने त्याची टिप्पणी बनवून मा. आयुक्तांकडे सादर केला. आयुक्तांनी मंजूर करताना उशीर लावला. त्याच्यानंतर निविदा काढण्यात आली. निविदा काढून ही मंजूरी झाली. मध्यंतरी आचार संहिता पण लागली. म्हणून लेट झाला. ज्यावेळी आपण एखादा प्रपोजल टाकतो त्यावेळी जो निधी उपलब्ध आहे त्याच्या तरतूद रजिस्टरमध्ये आपण ती तरतुद टाकतो. ह्याच्यानंतर ह्याचे जेव्हा बील येईल ते बील जेव्हा काढणार त्या प्रभाग निधीचे असतील. बील काढताना तरतूद रजिस्टर बघत नाही.

**दिपक खांबित :-**

तरतूद बघून काढतो.

**मा. सभापती :-**

प्रभाग निधीमध्ये जी तरतूद आहे. समजा ९५ नगरसेवकांनी प्रत्येकानी प्रभाग निधीमध्ये ती तरतूद टाकली. त्या कामाची आपण निविदा काढतो. काही लोक लेट देतात, काही लोक लवकर देतात. त्यामुळे फंड शिल्लक राहतो. ज्याचे बील पहिले येते त्यांचे तरतुद मधून मायनस होते आणि ज्याचे बील येत नाही त्याचे बील नेक्स्ट इयरच्या प्रभाग निधी किंवा नगरसेवक निधीमध्ये पडते अशी सिस्टिम आहे.

**दिपक खांबित :-**

ह्यावर्षी ५० नगरसेवक प्रभाग निधी वापरायला लेटर दिले नाही. टेंडर निघणार कधी.

**जुबेर इनामदार :-**

अजून तुमचे मार्च येणे बाकी आहे. लोकांचे पत्र येणे बाकी आहे. त्याच्या निधीची मांग करणे बाकी आहे.

**दिपक खांबित :-**

सगळ्यांना एक वर्ष पैसे मिळाले नाही. ते ह्याच्यामुळेच मिळाले नाही. सगळे एवढे जाम झाले की पैसेच देऊ शकलो नाही.

**जुबेर इनामदार :-**

२०१७-१८ मध्ये आमच्या निधीची काम का झाली नाही. कारण आचार संहिता लागली. त्यानंतर आयुक्तांनी काही विषयावर निर्णय घेतले नाहीत. बहुतेक लोकांचा निधी लॅब्स झाला.

**दिपक खांबित :-**

गेल्या वर्षी ३१ मार्चला सर्व स्टॉप झाले. ह्या वर्षी जो निधी आहे जी काम मंजूर होतील ती कन्टीन्ह्यू चालणार.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही नविन प्रस्तावित केलेली काम त्याला फक्त तुम्हाला मुभा आहे तीच काम तुम्ही करणार. जुनी काम.

**दिपक खांबित :-**

जुनी काम मंजूर आहेत. वर्कऑर्डर दिली आहे. प्रोसेसमधली मंजूर झालेली.

**जुबेर इनामदार :-**

मंजूर झालेले वर्क ऑर्डर दिलेले त्यांना तुम्ही कार्यादेश देऊन झालेले. त्यांना तुम्ही चालू वर्षामध्ये समावेश करुन घेतला तर कुठे तरी योग्य विषय असेल. ज्या निविदांना अजून मंजूरीच नाही त्या २०१६-१७ च्या प्रस्तावाला आज मंजूरी देता.

**दिपक खांबित :-**

प्रशासकीय आर्थिक मंजूरी आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासकीय आर्थिक मंजूरी नगरसेवक निधीचे काम आहे. आर्थिक प्रशासकीय मंजुरीची गरजच नाही. २५ लाखाच्या आतले काम आहे. आयुक्तांच्या अवलोकनामधले काम आहे. २२ लाखाचे काम आहे.

**दिपक खांबित :-**

ज्यांचे थोडे थोडे पैसे आहेत ना ते एकत्रित काढले. म्हणून ते एकत्रित २६ लाख झाले.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब आपल्याला ह्या वर्षामध्ये खर्च टाकता येईल का २०१६-१७ चा?

**दिपक खांबित :-**

३० टक्के काम स्पिल ओव्हर होत राहतात.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही आमची काम २०१६-१७ ला दिली होती. आमची तुमच्याकडे पत्र आहेत ती काम घ्या. आमची काही हरकत नाही.

**दिपक खांबित :-**

२०१६-१७ कुठली सर्वांची काम झाली आहेत.

**जुबेर इनामदार :-**

२०१६-१७ नाही, २०१७-१८ ला दिली आहेत.

**दिपक खांबित :-**

ती पण सर्व काम झाली.

**जुबेर इनामदार :-**

आमची प्रभाग निधीची कामच झाली नाहीत. नगरसेवक निधी आम्हाला मिळाली नाही. तुम्ही आम्हाला दिली नाही आम्हाला द्या.

**दिपक खांबित :-**

२०१६-१७ ची आहेत. २०१७-१८ ची नाही झाली. २०१७-१८ ची दिलीच नाही डिसीजन झाले.

**जुबेर इनामदार :-**

मग ही २०१६-१७ ची का? दोन वर्ष मागचा प्रस्ताव हा नव्याने प्रस्ताव केला पाहिजे.

**मा. सभापती :-**

तो प्रस्ताव कन्टीन्यू आहे. एकदा मंजूरी दिल्यानंतर तो प्रस्ताव कन्टीन्यू मंजुरीची डेट व्हॅलीड असते. ऑडिटचा अजून एक आक्षेप आहे. त्याची तयारी करा.

**मा. सभापती :-**

ठराव मांडला का?

**जुबेर इनामदार :-**

आमचा ह्याला विरोध आहे.

**राजीव मेहरा :-**

टोटल नंबर ऑफ कॅमेरा कितने है।

**मा. सभापती :-**

सब वहाँ पे लिखा है। इसमें इन्होंने एक रेट की मंजूरी लिया है। सी.सी. कॅमेरा लगते है उसके लिए क्या-क्या चाहिए।

**राजीव मेहरा :-**

नही दिया। आपने ग्रॅन्ट टोटल दिया है। आपने ग्रॅन्ट टोटल दिया २४ लाख उपर दिया २२.५३ ठिक है उसमें केबल का रेट दिया है। ६६ पर मीटर फिर ग्रॅन्ट टोटल कहाँ से आया। जब आपके पास कॅट ५ की कॉन्टेटी नही है। यहाँ पे आपने नंबर ऑफ कॅमेरा नही दिया। १४,९,१०,११ नंबर एक ही चीज दो बार दिया है।

**मा. सभापती :-**

सप्लाय ॲन्ड इन्स्टॉलेशन फॉर टी बी मतलब फॉर टेराबाईट उसके बाद सिक्स टेराबाईट, ८ टेराबाईट है।

**राजीव मेहरा :-**

वो हार्ड डिस्क ड्राइव्ह की कॅपेसिटी स्टोरेज हार्ड डिस्क में होती है। पॉईन्ट १४ वह स्टोरेज डिव्हाइज क्या है। हार्ड डिस्क की स्टोरेज डिव्हाइज रहती है।

**मा. सभापती :-**

इसमें दो आयटम है लिनोवा भी है और एच.पी है। दोनो में जो लगेगा वो।

**राजीव मेहरा :-**

लेकिन आप ग्रॅन्ट टोटल में ले रहे है इसकी भी कॉस्ट आ रही है। उसकी भी कॉस्ट आ रही है।

**मा. सभापती :-**

उसका एक रेट है।

**राजीव मेहरा :-**

आपने निचे ग्रॅन्ट टोटल इन फिगर दिया है।

**मा. सभापती :-**

ॲप्रोक्सीमेटली इतना पैसा लगेगा वो है।

**राजीव मेहरा :-**

हो नही सकता यहाँ पर पाच हजार तीनसो तीन पर कॅमेरा कॉस्ट दिया है। नंबर ऑफ कॅमेरा नही है तो कॉस्ट कैसे आएगा।

**जुबेर इनामदार :-**

सिंगल कॅमेराचा रेट दिला आहे. टोटल टू कर दिया। सिंगल कॅमेराचा रेट दिला आहे. प्रभाग का टोटल कर दिया सिंगल कॅमेरा का रेट पुरे प्रभाग में एक ही कॅमेरा लगाओगे।

**मनस्वी म्हात्रे :-**

जे रेट मागवले आहेत ते युनिट रेट मागवले आहेत. विषयामध्ये असे म्हटले आहे की आवश्यकतेनुसार आम्ही तो सप्लाय करणार. मॅडमच्या एरियामध्ये तीन ठिकाणी लावायचे आहेत. त्याचे तीन एकत्र इस्टीमेट न करता तीन वेगवेगळे इस्टीमेंट केले आहेत. त्यानुसार एका ठिकाणी चार कॅमेरा लागतील. एका ठिकाणी आठ कमेरा लागतील. हा रेट पर युनिट रेट आहे. त्यानुसार त्याला वर्क ऑर्डर दिली जाईल. जी टोटल केलेली आहे ती युनिट रेटची फायनली ग्रॅन्ड टोटल म्हणून दिली आहे.

**राजीव मेहरा :-**

जब आपके पास कॉन्टेटी नही है तो आपका ग्रॅन्ड टोटल कहाँ से आएगा। एक ही चीज दो बार लिखते हो स्टोरेज डिव्हाइज क्या है।

**मनस्वी म्हात्रे :-**

तुम्ही जर एन.वी.आर बघाल तर फोन चॅनल, ८ चॅनल, १६ चॅनल सगळेच मागवलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी तो लागणार नाही.

**राजीव मेहरा :-**

एन.वी.आर अलग चीज है। NVR is a different it’s a space of 4 channel, 8 channel camera can we connect, 8 channel and 16 channel and 32 channel. I am talking about the storage device.

**मनस्वी म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये जसे एन.वी.आर लागणार त्याप्रमाणे हार्ड डिस्क लागणार. ३ कॅमेरा असतील तर आपल्याला ६ टीबी किंवा ८ टीबी ची गरज नाही. ४ टीबी हार्ड डिस्क चालणार आहे. त्याचप्रमाणे ३२ चॅनल एनवीआर आम्ही लावणार. त्यावेळेला आपल्याला मोठ्या स्टोरेज डिव्हाइजची आवश्यकता लागणार आहे. म्हणून तो एक आयटम ॲड केलेला आहे.

**राजीव मेहरा :-**

आपने स्टार्ट में दिया है ९,१०,११ इट इज ४ टीबी, ६ टीबी, ८ टीबी धीस इजर स्टोरेज डिव्हाइज, हार्ड डिस्क ड्राइव्ह स्टोरेज डिव्हाइज ॲज पर दर नंबर ऑफ कॅमेरा ४ फोर्ट का होगा तो ४ टी.बी. चल जाएगा, ८ फोर्ट का होगा तो ८ टीबी चलेगा। लेकिन यही चीज जिसकी कॉन्टेटी नही है।

**मनस्वी म्हात्रे :-**

नही।

**राजीव मेहरा :-**

१० लगेंगे २० लगेगा कुछ आयडीया नही है। तो आपका ग्रॅन्ड टोटल कैसे आया।

**मनस्वी म्हात्रे :-**

इनकी एकही गलती है की जो ग्रॅन्ड टोटल मारा वह मारना नही चाहिए था। ग्रॅन्ड टोटल नही है इन्होंने सिर्फ रेट मंजूर किया है। अगर जहाँ जहाँ लगेंने उतने ही कॅमेरे इन्स्टॉल करेंगे।

**राजीव मेहरा :-**

साहब आपका प्रभाग निधी अमाऊन्ट २६ लाख रुपये है।

**मा. सभापती :-**

नही गलत बात है। प्रभाग निधी अमाऊन्ट २६ लाख रुपये नही है। ५-७ लाख रुपये है। इटस डिपेंड अपॉन कार्पोरेटर. कार्पोरेटर यह ६ से ७ लोगो का निधी है। इसमें प्रभाकर म्हात्रेजी का भी है।

**राजीव मेहरा :-**

मैं उसमें नही जा रहा हूँ।

**मा. सभापती :-**

इनका एक ही गलती है जो लास्ट में टोटल मारा वह गलती है।

**राजीव मेहरा :-**

आपका नंबर ऑफ कॅमेरा कितना है वह मालूम नही है।

**मा. सभापती :-**

इन्होंने टेंडर मंगाया ६ नगरसेवकने बोला की हमारे प्रभाग में कॅमेरा लगाना है। फिर इन्होंने सबको इकठ्ठा किया और टेंडर मंगाया यहाँ पे हमें कॅमेरा लगाना है। वह अलग अलग टाईप के कॅमेरे है उनका रेट मंगाया है। वह रेट के अनुसार मंजूर किया है। इनकी सिर्फ एकही गलती है की जो टोटल मारी है वह टोटल नही मारना चाहिए। जो इन्स्टॉल करेंगे वह ॲज पर लोकेशन में जाके कहाँ कहाँ कॅमेरे लगाने है वह हिसाब से जो खर्चा आएगा वह उसका बिल देंगे। इसका मतलब इतना पेमेंट नही करेंगे। हो सकता है २० लाख के अंदर १० लाख का पेमेंट हो वह ॲजपर जो चीज वहाँ पे लगेगी ॲज पर कॅमेरा, ॲज पर वायरींग, इन्फ्रास्ट्रक्चर उस हिसाबसे पेमेंट होगा। पुरा बिल पेमेन्ट नही होगा। वह उनकी सिस्टम है।

**जुबेर इनामदार :-**

रिॲप्रोप्रिएशन करायला लागेल.

**मा. सभापती :-**

जुबेरजी ह्याच्यात रिॲप्रोप्रिएशनची गरज केव्हा पडेल जेव्हा तुमची प्रभाग निधी संपेल. ९५ नगरसेवक आपली प्रभाग निधीची काम केल्यानंतर जेव्हा बील येईल आणि बिल करता अमाऊन्ट नसेल तेव्हा ती रिॲप्रोप्रिएशनला येणार. ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

**सदर कामी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद नाही . तरी सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**राजीव मेहरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. मेघना रावल, अनुमोदन श्री. अनिल विराणी. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. राजीव मेहरा. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. मेघना रावल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

सुचक श्रीम. मेघना रावल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने १०, विरोधात ५, तटस्थ ० इतकी मते पडली आहेत. श्रीम. मेघना रावल ह्यांचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ९३ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विवीध ठिकाणी आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही. पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वीत करणे (प्रभाग निधी) कामीच्या निवीदेस मंजुरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार सी.सी.टी.व्ही पुरवठा करणे व यंत्रणा कार्यान्वित करणे (प्रभाग निधी) कामी आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत उपरोक्त संदर्भ नोटीस अन्वये ऑनलाईन निविदा, दोन मुदतवाढी व फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त पात्र निविदा धारकाचा दराचा लिफाफा उघडला असता मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस यांनी सादर केलेले दर सर्वात कमी होते. प्राप्त दरांमध्ये दि. ०९/०७/२०१८ रोजी मा. निविदा समिती समोर वाटाघाटी करण्यात आल्या. त्यामध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे

**A. Consolidated Cost Summary (Inclusive of all taxes except GST)**

| Sr. No. | Particulars | Krystal Integrated Services | |
|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1. | Supply, Installation and commissioning of CCTV and other components as and when required in MBMC Area. (Prabhag Nidhi) | Rs. 26,29,241/- | Rs. 22,53,725/- |

B. Breakup of Consolidated Cost Summary

| Sr. No. | Description | Krystal Integrated Services | | |
|---|---|---|---|---|
| | | Make and Model | Quoted Rates | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1 | 3MP 30 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA ACCESSORIES as per tender specification | Hikvision | Rs. 5303 | Rs. 5303 |
| 2 | 3MP 50 meter IP BASED IR BULLET OUTDOOR CAMERA & ACCESSORIES as per tender specifications. | Hikvision | Rs. 12915 | Rs.12915 |
| 3 | Supply and Installation for 4 channel NVR | Hikvision | Rs. 13073 | Rs. 7270 |
| 4 | Supply and Installation for 8 channel NVR | Hikvision | Rs. 50243 | Rs. 9950 |
| 5 | Supply and Installation for 16 channel NVR | Hikvision | Rs. 79275 | Rs. 21500 |
| 6 | Supply and Installation for 32 channel NVR | Hikvision | Rs. 86100 | Rs. 44670 |
| 7 | 1KM 5.8GHz wireless bridge outdoor type IP66 | SCORPION F300 | Rs. 56700 | Rs.44093 |
| 8 | Video Management Software with license for 150 cameras recording, viewing and playback capability as per tender specifications. | Hikcentral - VSS- 1 Channel | Rs. 1733 | Rs.1733 |
| 9 | Supply and Installation 4 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 7718 | Rs.7718 |
| 10 | Supply and Installation 6 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 12233 | Rs.12233 |
| 11 | Supply and Installation 8 TB Sata HDD Hard Drive | Seagate | Rs. 17220 | Rs. 17220 |
| 12 | Network Video Server with keyboard, mouse, monitor, HDD storage hardware & required software, with its accessories as per tender specifications. | Lenovo / HP | Rs. 548543 | Rs. 548543 |
| 13 | Client Work Station for Viewing with its accessories as per tender specifications. | Lenovo / HP | Rs. 78411 | Rs. 78411 |
| 14 | Storage device having capacity to store 30 days recording of 150 cameras each of 3MP resolution at 25FPS | Lenovo / HP | Rs. 1126560 | Rs. 1126560 |
| 15 | Supply and Installation for Monitor - LCD 20" Monitor as per tender specifications. | Samsung B2030 | Rs. 8768 | Rs. 8768 |
| 16 | Supply and Installation for Monitor - LCD 32" Monitor as per tender specifications. | Samsung HG32AE460 | Rs. 19268 | Rs. 19268 |
| 17 | 24+4 PORT ETHERNET POE SWITCH with its accessories as per tender specifications. | Allied Telesis AT-x930-28GPX-N1-00 | Rs. 257573 | Rs. 43067 |
| 18 | 8 port gigabit LAN switch | Allied Telesis AT-GS950/8 | Rs. 11697 | Rs. 11697 |
| 19 | CAT 6e ETHERNET cable with necessary PVC Conduits, fixtures & junction box as required as per tender specifications. Supply of conduit, fixtures and junction boxes are in cope of vendor. | Dlink NCB-C6UGRYR - 305 | Rs. 66 | Rs. 66 |
| 20 | POLES FOR MOUNTING THE CAMERAS with its accessories as per tender specifications. | OEM | Rs. 11025 | Rs. 11025 |
| 21 | Outdoor weatherproof junction boxes pole mounted with MCB, POE injector, cameras power supply or POE source and surge protectors required for wireless antennas | OEM | Rs. 9450 | Rs. 9450 |
| 22 | Lightening arrestors on poles for protection | OEM | Rs. 1890 | Rs. 1890 |
| 23 | 21UX600MM WX800MM D RACK for Viewing Station with its accessories wheel etc. as per tender specifications. | Valrack 22U | Rs. 20475 | Rs. 20475 |
| 24 | Installation, Testing & Commissioning of the system. Laying & Termination of Power And Data Cables etc. | OEM | Rs. 630 | Rs. 630 |
| 25 | Supply and Installation for 4U DVR Rake | Valrack 4U | Rs. 3728 | Rs. 3728 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | Supplying and fixing 6U Wall Mount Rack (Dimension-DxWXH - 450X550X367 mm) | Valrack 6U | Rs. 4043 | Rs. 4043 |
| 27 | Sector Antenna 5G, Gain 47dbi, or as per actual site requirement | OEM Mikrotik | Rs. 12600 | Rs. 12600 |
| | **Grand total in Figures (T)** | | **Rs. 2457240** | **Rs. 2006134** |

C. AMC

| Sr. No. | Particulars | Krystal Integrated Services | |
|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
| 1. | Comprehensive Maintenance for Second Year | Rs.73717 | Rs.73717 |
| 2. | Comprehensive Maintenance for Third Year | Rs.98289 | Rs.80000 |
| **Grand total in Figures (T)** | | **Rs.172006** | **Rs.153717** |

वरील कामाकरीता वाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरांस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे

**सुचक :- श्रीम. मेघना रावल** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | निरंक |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | श्रीम. वंदना विकास पाटील | |
| ३ | श्रीम. यादव मीरादेवी रामलाल | ३ | श्रीम. तारा विनायक घरत | |
| ४ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | ४ | श्री. राजीव मेहरा | |
| ५ | श्रीम. वंदना मंगेश पाटील | ५ | श्री. जुबेर इनामदार निरंक | |
| ६ | श्रीम. रावल मेघना दिपक | | | |
| ७ | श्रीम. वर्षा भानुशाली | | | |
| ८ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | | | |
| ९ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| १० | श्रीम. दिप्ती भट्ट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, **नगरसेवक निधीतुन शाळांकरीता संगणक खरेदी करणे.**

**मा. सभापती :-**

अवलोकन आहे. अवलोकन मंजूर.

**प्रकरण क्र. ९४ :-**

**नगरसेवक निधीतुन शाळांकरीता संगणक खरेदी करणे.**

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. नगरसेवक निधितुन संगणक खरेदी करणेकामी ई निविदा मागविणेकामी सदर खरेदी महाराष्ट्र शासन उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र:- संर्किण-२०१६/प्र.क्र.२१५/ उदयोग-४ दि.२४/०८/२०१७ केंद्रशासनाने विकसित केलेल्या गर्व्हनमेंट ई- मार्केट प्लस (Gem) पोर्टलदवारे खरेदी करणेस मा. अति. आयुक्त यांच्या मंजुरीने निविदा मागविण्यात आल्या. सदर

निविदेस प्रतिसाद मिळून १६ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी २ निविदिधारक पात्र असल्याने स्पर्धात्मक निविदा होत नसल्याने दि.०५/०५/२०१८ रोजी फेर निविदा मागविण्यात आली असता सहा निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी एकच निविदा पात्र ठरली.

पात्र निविदाधारक **M/s. KJM Group System Solutions.,** यांनी निविदेत सादर केलेले दर हे **Low specification** चे असल्याने दि.१४/०८/२०१८ रोजी फेरनिविदा मागविली असता एकूण १५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदाधारकांपैकी ४ निविदाधारक पात्र ठरले. पात्र निविदाधारकांचा दराचा तपशिल खालीलप्रमाणे

| तपशिल | M/s.Sun Systems (L1 निविदाधारक) | | M/s.Mccann Info Solution (L2 निविदाधारक) | | M/s.Maheshwari Computers Pvt.Ltd., (L3 निविदाधारक) | | M/s.KJM Group System Solutions (L4 निविदाधारक) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Desktops** | मंजुर दर प्रति नग | एकूण खर्च | मंजुर दर प्रति नग | एकूण खर्च | मंजुर दर प्रति नग | एकूण खर्च | मंजुर दर प्रति नग | एकूण खर्च |
| | **Rs.33,460/-** | **Rs.3,34,600/-** | **Rs.34,000/-** | **Rs.3,40,000/-** | **Rs.36,500/-** | **Rs.3,65,000/-** | **Rs.39,825/-** | **Rs.3,98,250/-** |

**Specification - Intel 7th generation, Intel Core i3-7100 (3.9 GHz, 3 MB Cache, 2 Cores), Intel H110 chipset, RAM - 4GB DDR 4, 2400 MHz, Cabinet, Windows 10 professional, 10/100/1000 on board Integrated Gigabit Port, USB Port 2.0 - 4, USB Port 3.0 - 4, Monitor Size 18.5, Resolutions 1366 x 768, Hard disk 1000 GB, On site 3 years warranty**

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **M/s.Sun Systems** यांचे दर इतर निविदाधारकांच्या तुलनेत कमी आहेत. सदर कामी **M/s.Sun Systems** या निविदाधारकाने सादर केलेले दरास मा.निविदा निवड समितीने शिफारस करण्यात आलेली आहे.. **M/s.Sun Systems** यांचे दरास मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73**(ड) नुसार मा.स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात येत आहे

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, **मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Install and Maintain E -Curriculum Module at Various Schools of Mira Bhaindar Municipal Corporation कामी निविदेस मंजूरी देणेबाबत.**

**हसमुख गेहलोत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, install and Maintain E-Curriculum Module at Various schools of Mira Bhaindar Municipal Corporation **करणेकामी** MBMC/comp/४०६/२०१७-१८ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर २५/०१/२०१८ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली. सदर निविदेस दि.२०/०२/२०१८ रोजी प्रथम मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झालेली नाही. सदर निविदेचे टेंडर आयडी २०१७_MBMC_२७८७३१_१ आहे.

या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दि.०३/०३/२०१८ रोजी व्दितीय मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदरकामी दि. १७/०४/२०१८ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली असता निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही. सदरकामी मा.सभापती स्थायी समिती यांचे निधितून करणे मा. आयुक्त सो. यांची दि. १७/०५/२०१८ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. याकामी मा. स्थायी समिती सभा दि.७/०७/२०१८ प्र.क्र.३१, ठराव क्र.२८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.सदर कामाची दि.१६/०७/२०१८ रोजी निविदा नोटीस प्रसिध्द करुन टेंडर आय डी **2018_MBMC_334744_1** नुसार फेरनिविदा मागवण्यात आल्या होत्या. या निविदेस प्रतिसाद मिळून तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी M/s.Edulight व M/s.Selfguru educational

technologies Pvt.Ltd., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्यामुळे पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारकांचा निविदेचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा निवड समितीने दि.२६/०९/२०१८ रोजी शिफारस केलेली आहे. त्यानुसार निविदाधारकांनी निविदेस व वाटाघाटीनंतर सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | Make | M/s.Edulight निविदेतील दर | | | M/s.Edulight वाटाघाटीनंतरचे दर | M/s.Selfguru educational technologies Pvt.Ltd., निविदेतील दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Quantity | Rate per Unit | Total Cost | | Quantity | Rate per Unit | Total Cost |
| A १ | Projector as per specification with Celling Mounting of Projector with Stand, Electrification Fitting | View Sonic | 22 | 45,000 | 9,90,000 | 9,90,000 | 22 | 47000 | 1034000 |
| २ | Interactive Board as per Specification | Cromatic | 22 | 60,000 | 13,20,000 | 8,80,660 | 22 | 62500 | 1375000 |
| ३ | Speaker 2.1 as per Specification | Zebronic | 22 | 6500 | 1,43,000 | 1,43,000 | 22 | 7500 | 165000 |
| ४ | Projector Screen as per Specification | | 22 | 4500 | 99,000 | आवश्यकता नाही | 22 | 5000 | 110000 |
| ५ | Cloud PC | Citrus | 22 | 30,000 | 6,60,000 | 6,60,000 | 22 | 32500 | 715000 |
| ६ | E- Curriculum (Content) as Per Specification Standard -1 to 8 Medium-Marathi, Hindi, Semi-English,Urdu, Gujrathi | Approved by Balbharati | 22 | 40,000 | 8,80,000 | 8,26,340 | 22 | 42500 | 935000 |
| | Comprehensive on site Annual Maintenance Cost for 2 Years | | 2 years | 12,000 per school per year | 5,28,000 | Free | | | |
| | Total (A) | | | | 46,20,000 | 35,00,000 | | | 4334000 |
| B. | Comprehensive on site Annual Maintenance Cost for Third Years | | Third year | 12,000 per school per years | 2,64,000 | 2,64,000 | 3 years | 40000 | 880000 |
| 1. | Grand Total (A+B) (In Words Thirty seven lac sixty four thousand only ) | | | | 48,84,000 | 37,64,000 | | | 5214000 |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता M/s. Edulight यांचे निविदेतील दर हे इतर निविदाधारक M/s.Selfguru educational technologies Pvt.Ltd. निविदाधारकांच्या तुलनेत कमी असल्याने M /s. Edulight,यांनी

वाटाघाटीनंतर सादर केलेले दर स्विकारणेस मा. निविदा निवड समितीने शिफारस करण्यात आलेली आहे. तिस-या वर्षी वार्षिक देखभाल दुरुस्ती कामी रु.२,६४,०००/- तरतुद सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागाच्या लेखाशिर्षात करणे आवश्यक आहे. **M/s.Edulight** यांच्या वाटाघाटीनंतरच्या दरास मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73(क)** नुसार मा.स्थायी समिती सभेत मंजूरी देण्यात येत आहे.

**अशोक तिवारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ९५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, Install and Maintain E -Curriculum Module at Various Schools of Mira Bhaindar Municipal Corporation कामी निविदेस मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ८० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका Supply, install and Maintain E-Curriculum Module at Various schools of Mira Bhaindar Municipal Corporation करणेकामी MBMC/comp/४०६/२०१७-१८ https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर २५/०१/२०१८ रोजी निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आली. सदर निविदेस दि.२०/०२/२०१८ रोजी प्रथम मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झालेली नाही. सदर निविदेचे टेंडर आयडी २०१७_MBMC_२७८७३१_१ आहे.

या निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दि.०३/०३/२०१८ रोजी व्दितीय मुदतवाढ दिली असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदरकामी दि. १७/०४/२०१८ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली असता निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही. सदरकामी मा.सभापती स्थायी समिती यांचे निधितून करणे मा. आयुक्त सो. यांची दि. १७/०५/२०१८ रोजी मंजुरी प्राप्त झाली आहे. याकामी मा. स्थायी समिती सभा दि.७/०७/२०१८ प्र.क्र.३१, ठराव क्र.२८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.सदर कामाची दि.१६/०७/२०१८ रोजी निविदा नोटीस प्रसिध्द करुन टेंडर आय डी **2018_MBMC_334744_1** नुसार फेरनिविदा मागवण्यात आल्या होत्या. या निविदेस प्रतिसाद मिळून तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदाधारकांपैकी M/s.Edulight व M/s.Selfguru educational technologies Pvt.Ltd., यांनी निविदा अटीशर्तीनुसार कागदपत्र सादर केल्यामुळे पात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारकांचा निविदेचा दराचा लिफाफा उघडणेस मा. निविदा निवड समितीने दि.२६/०९/२०१८ रोजी शिफारस केलेली आहे. त्यानुसार निविदाधारकांनी निविदेस व वाटाघाटीनंतर सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | Make | M/s.Edulight निविदेतील दर | | | M/s.Edulight वाटाघाटीनंतरचे दर | M/s.Selfguru educational technologies Pvt.Ltd., निविदेतील दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Quantity | Rate per Unit | Total Cost | | Quantity | Rate per Unit | Total Cost |
| A १ | Projector as per specification with Celling Mounting of Projector with Stand, Electrification Fitting | View Sonic | 22 | 45,000 | 9,90,000 | 9,90,000 | 22 | 47000 | 1034000 |
| २ | Interactive Board as per Specification | Cromatic | 22 | 60,000 | 13,20,000 | 8,80,660 | 22 | 62500 | 1375000 |
| ३ | Speaker 2.1 as | Zebronic | 22 | 6500 | 1,43,000 | 1,43,000 | 22 | 7500 | 165000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | per Specification | | | | | | | | |
| ४ | Projector Screen as per Specification | | 22 | 4500 | 99,000 | आवश्यकता नाही | 22 | 5000 | 110000 |
| ५ | Cloud PC | Citrus | 22 | 30,000 | 6,60,000 | 6,60,000 | 22 | 32500 | 715000 |
| ६ | E- Curriculum (Content) as Per Specification Standard -1 to 8 Medium-Marathi, Hindi, Semi-English,Urdu, Gujrathi | Approved by Balbharati | 22 | 40,000 | 8,80,000 | 8,26,340 | 22 | 42500 | 935000 |
| | Comprehensive on site Annual Maintenance Cost for 2 Years | | 2 years | 12,000 per school per year | 5,28,000 | Free | | | |
| | Total (A) | | | | 46,20,000 | 35,00,000 | | | 4334000 |
| B. | Comprehensive on site Annual Maintenance Cost for Third Years | | Third year | 12,000 per school per years | 2,64,000 | 2,64,000 | 3 years | 40000 | 880000 |
| 1. | Grand Total (A+B) (In Words Thirty seven lac sixty four thousand only ) | | | | 48,84,000 | 37,64,000 | | | 5214000 |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता M/s. Edulight यांचे निविदेतील दर हे इतर निविदाधारक M/s.Selfguru educational technologies Pvt.Ltd. निविदाधारकांच्या तुलनेत कमी असल्याने M /s. Edulight,यांनी वाटाघाटीनंतर सादर केलेले दर स्विकारणेस मा. निविदा निवड समितीने शिफारस करण्यात आलेली आहे. तिस-या वर्षी वार्षिक देखभाल दुरुस्ती कामी रु.२,६४,०००/- तरतुद सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागाच्या लेखाशिर्षात करणे आवश्यक आहे. **M/s.Edulight** यांच्या वाटाघाटीनंतरच्या दरास मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **1949** चे कलम **73**(क) नुसार मा.स्थायी समिती सभेत मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, **निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)**

**अनिल विराणी :-**

| अ. क्र. | टेंडर आय.डी. | कामाचे नाव / ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च/ ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | **वृत्तपत्राचे नांव व प्रसिध्दी दिनांक** | निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **328463_1** | **मिरारोड (पू.) आरक्षण क्र. २४६ येथील मैदानात क्रिकेट पिच बांधणे, त्यांचे दैनंदिन संचलन, देखभाल दुरूस्ती करण्यासाठी भाडे तत्वावर देण्यातबाबत.** | - | ११/५/२०१८ | दै. गावकरी, सा. हिंदी सागर दि.६/७/२०१८ | दि.११/७/१८ |

| तपशील | मनपास देण्यात येणारे मासिक भाडे रक्क्कम | | | |
|---|---|---|---|---|
| | अंगुठाछाप चॅरिटेबल ट्रस्ट | ब्राओ मार्केटींग | ब्राओ क्रिकेट ॲकेडमी | रायझिंग स्टार स्पोर्टस फाऊंडेशन ट्रस्ट |
| दररोज दोन तासाकरीता देण्यात येणारे प्रति महिना भाडे रक्क्कम **(टिप: दररोज दोन तासाकरीता जास्तीत जास्त भाडे दर देणा-या संस्थेस खेळपट्टी भाडयाने देण्यात येईल.)** | **10299** | 2501 | 5555 | 3000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | **318683_1** | **मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर नं ०९ येथील कलावती आई अभ्यासिका केंद्र शेजारील मैदानातील क्रिकेट खेळपट्टी प्रशिक्षण देण्यासाठी भाडयाने द्यावयाचे आहे.** | - | दि.४/७/२०१७ | दै. महाराष्ट्र सम्राट / सुरज प्रकाश दि.१७/०५/१८ | दि.२१/०५/१८ |

| तपशील | मनपास देण्यात येणारे मासिक भाडे रक्क्कम | | |
|---|---|---|---|
| | **श्री साई श्रध्दा महिला सेवा संघ** | कोकण सेवा संस्था | ओम साई समाज सेवा संस्था |
| दररोज दोन तासाकरीता देण्यात येणारे प्रति महिना भाडे रक्क्कम **(टिप: दररोज दोन तासाकरीता जास्तीत जास्त भाडे दर देणा-या संस्थेस खेळपट्टी भाडयाने देण्यात येईल.)** | **7600** | 5000 | 3000 |

**वरील दराची अ .क्र. १ ची निविदा मंजूर करण्यात येत आहे . अ.क्र. २ च्या निविदेतील भाडे रक्कम कमी असल्याने सदर निविदा रद्द करुन फेर निविदा मागविण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.**

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरारोड शांतीनगर सेक्टर ९ चा हा ५/१२/२०१७ ला स्थायी समितीमध्ये मंजूरीला आला होता. तेव्हा हा विषय वरील नमूद केलेल्या कामाकरिता माहे साईश्रध्दा संस्था दोन तासाकरिता ११००० आपल्याला पर डे आहे. सेम संस्था साई श्रध्दा समाज सेवा संस्था १११२२ रुपये.

**राजीव मेहरा :-**

जब जादा दे रहे थे तो कॅन्सल क्यों किया। १०-१२ महिने का नुकसान हुआ लाख देड लाढ का नुकसान हुआ।

**मा. सभापती :-**

उस समय ऐसा लगा था की यह रेट कम है। उसके लिए इसको बढाके देंगे। उसको रिकॉल करते है।

**राजीव मेहरा :-**

और ६ महीने जाऐंगे।

**मा. सभापती :-**

नही तुरंत निकालेंगे।

**राजीव मेहरा :-**

पहले १२ महिने लग गए।

**मा. सभापती :-**

वह अपना काम नही प्रशासन का काम है।

**राजीव मेहरा :-**

उसके पहले भी कॅन्सल हुआ है।

**मा. सभापती :-**

प्रशासन का काम है प्रशासन इम्पलीमेन्ट करेगा।

**जुबेर इनामदार :-**

पहले ११००० द्यायला तयार होते. आता ७६०० देतात. प्रशासनाने तेव्हा ती भुमिका घेतली पाहिजे होती. तेव्हा ही ह्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली होती. आम्ही ह्या विषयाचा विरोध केला की करु नये. पालिकेचे आर्थिक नुकसान होईल. मा. सभापती काय निर्णय घेतला.

**मा. सभापती :-**

रिकॉल करुया.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे रिकॉल करु पण परत आले नाही तर. मा. सभापती महोदय ह्या सभागृहात तुम्ही सभापती असताना दि. ०५/१२/२०१७ ला सुचक प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. अनिल विराणी अ.क्र. म्हणजे आजच्या सभेमध्ये प्रकरण क्र. ९६ अनुक्रमांक २ मिरारोड शांतीनगर सेक्टर ९ कलावती आई अभ्यासिका केंद्र शेजारील मैदानातील क्रिकेट खेळपट्टी प्रशिक्षण देण्यासाठी भाड्याने देणेबाबतचा विषय प्रस्तावित केलेले. तोच विषय ५/१२/२०१७ ला प्रकरण क्र. १७ ला विषयपटलावर होता. ठराव क्र. १७ झालेला आहे. मिरारोड शांतीनगर सेक्टर क्र.२ येथील कलावती आई अभ्यासिका केंद्र शेजारील मैदानातील क्रिकेट खेळपट्टी प्रशिक्षण देण्यासाठी भाड्याने द्यायचे. ह्या सभागृहामध्ये ठराव करण्यात आला. सदरचे भाडे कमीचे आहे आणि तो विषय फेरनिविदेसाठी प्रस्तावित करण्यात आला. आज दि. २९/९/२०१८ कमीत कमी १२ महिने उलटल्यानंतर तो विषय विषयपत्रिकेवर आहे आणि प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये त्या संस्थेनी साई श्रध्दा सेवा श्रध्दा संस्था ह्यांनी २०१७ मध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रशासनाने गोषवाऱ्याच्या माध्यमातून स्थायी समितीच्या मंजूरीला प्रस्तावित केला होता. त्या संस्थेचे नाव परत एकदा २९.९.२०१८ च्या गोषवाऱ्यामध्ये प्रस्तावित केलेले आहे. मात्र दरात तफावत आहे. तेव्हा १११२२ रुपये प्रती महा असे त्यांनी प्रस्तावित केले होते. त्याला स्थायी समितीने बहुमतावर फेटाळले. विषय फेर निविदेसाठी प्रस्तावित केला आज ७६०० रुपये दराची निविदा मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे आणून दिले आहे. हे नियमबाह्य आहे. करता येत नाही. निविदा प्रक्रिया संपून गेल्यानंतर प्रशासन आपल्याकडे विषय मंजुरीसाठी प्रस्तावित करतो. ५/१२/२०१७ ते आज ११ ते १२ महिने जे उलटले तर पालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. १११२२ ह्या दराने ही खेळपट्टी देता आली असती ती आम्ही दिलेली नाही. आज ७६०० चा प्रस्ताव प्रशासनाने आमच्यासमोर ठेवलेला आहे. परत फेरनिविदेसाठी हा विषय पाठवणे हा कायद्याच्या दृष्टीकोनातून योग्य नाही. ह्या ठरावाला विरोध आहे. तसेच प्रशासनानी ३-३, ४-४ वेळा निविदेची कार्यपध्दत झाल्यानंतर न सांगता कारणामुळे अशाप्रकारे निविदेला तुम्ही फेरनिविदेसाठी स्थायी समितीस पाठवणे योग्य नाही. त्याला ठोस कारण असावीत. फेर निविदेमध्ये हे ११००० पेक्षा कमी आले. एकतर आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच परत फेरनिविदा प्रशासन स्थायी समिती ठराव प्रस्तावित करत आहे. नुकसान झाले किंवा कमी निविदा भरण्यात आले तर ह्याला जबाबदार कोण असणार हे निश्चित करावे. **स्थायी समिती दि. 29/9/2018 प्रकरण क्र. 96 निविदेस मान्यता देण्यामध्ये त्याच्यामध्ये विषय क्र . 2 मिरारोड पूर्व शांतीनगर सेक्टर येथील 9 मध्ये कलावती आई अभ्यासिका केंद्र शेजारील मै दानातील क्रिकेट खेळपट्टी प्रशिक्षण भाड्याने देणेबाबत आयुक्तांची प्रशासकीय आर्थिक मान्यता दि . 4/7/2017 महाराष्ट्र सम्राट, सूरजप्रकाश माध्यमामध्ये केलेली प्रसिध्दी तसेच निविदा प्रसिध्दी दि . 21/5/2018 रोजी दररोज 2 तासासाठी देण्यात येणारे प्रतिमाह भाडे रक्कम 7,600/- असे प्रस्तावित करण्यात आले आहे . सदर मालमत्तेचा विषय पालिकेने भाडेतत्वावर**

**देण्यासाठी स्थायी समिती दि. 5/12/2017 रोजी प्रकरण क्र. 17 टेंडर आयडी 209246_1 मिरारोड पूर्व शांतीनगर सेक्टर क्र. 9 येथील कलावती आई अभ्यासिका केंद्र शेजारील मैदानातील क्रिकेट खे ळपट्टी प्रशिक्षण देण्यासाठी भाड्याने द्यायचे आहे असा विषय मांडला होता. प्रस्तावित केला होता त्याला ही साई श्रध्दा महिला सेवा संस्थानी त्या निविदा प्रक्रियेतून 11,122/- अशी रक्कम प्रति माह पालिकेला देण्याचे सूचित केले होते. तरी पालिकेचे गेल्या 12 महिन्यांमध्ये जे काही आर्थिक नुकसान झालेले आहे. त्या धर्तीवर प्रशासनाने चौकशी करावी तसेच संबंधीतांवर कारवाई करावी आणि केलेला ठराव निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरचा होता . निविदा प्रक्रिया प्रशासनाने पूर्ण केली होती. फेरनिविदा मागविण्याचे काही कारण नसताना सुध्दा अ शी फेरनिविदा मागवणे स्थायी समितीला योग्य नाही तरी प्रशासनाने ह्याच्यावर गांर्भियाची नोंद घेऊन योग्य कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.**

**राजीव मेहरा :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही विषय मंजूर नाही बोलतात पण हे करताच येत नाही. अशाप्रकारे आपल्याला निविदा प्रक्रिया पूर्ण त्याला कारण काय एका बाजूला ११ महिने, १२ महिने.

**मा. सभापती :-**

आपली ही निविदा मंजूर झाली नाही.

**जुबेर इनामदार :-**

माझे म्हणणे तसे नाही. माझे म्हणणे असे आहे ५/१२/२०१७ ला जो प्रस्ताव स्थायी समितीमध्ये प्रस्तावित केला होता तो ११११२२ चा होता. आज तो ७६०० पर्यंत आलेला आहे. झालेले आर्थिक नुकसान ह्याला जबाबदारी कोणाची त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार कारवाई होऊ शकते. आणि ते होणार. त्या विषयावर आमची मांग असणार आहे. त्या निविदेमध्ये ७६०० चा फक्त निविदा भरण्यात आलेली आहे. ह्याचा अर्थ हा दर कमी झालेला आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा दर कमी झाला आहे. प्रशासनाने आपले कर्तव्य पार पाडले आहे. निविदा प्रक्रिया कमी करुन म्हणजे झालेले नुकसान ह्या निविदा कमी का झाल्या कारण पुन्हा निविदा मागवल्या. स्थायी समितीने बहुमताच्या ताकदीवर प्रस्तावित केल्या त्या विषयावर आमचा विरोध आहे. क्रमांक १ ला मंजूरी देण्यात येत आहे.

**राजीव मेहरा :-**

मिरारोड स्मशानभूमी के यहाँ रिर्झव्हेशन १९६ वह महापालिका की प्रॉपर्टी है। वह भी दी हुहै है क्या?

**मा. सभापती :-**

तो विषय ह्याच्यात नाही.

**राजीव मेहरा :-**

मैं आपके नोटिस में लेके आ रहा हूँ। वह दिया नही है पर वहाँ पे बोर्ड लगाके ट्रेनींग चल रही है। क्या प्रशासन सेम क्रिकेट पीच बनाई हुई है। नेट्स लगे हुए है। उसका रेव्हेन्यू महापालिका को आ रहा है। उसपे क्या ॲक्शन लेंगे, प्रायव्हेट आर.जी. में कोई प्रोग्राम होता है। जो नगरपालिका को हॅन्ड ओव्हर नही की गयी है। उसपे नगरपालिका मंडप का पैसा ले सकती है क्या?

**मा. सभापती :-**

यह विषय के लिए आप आयुक्त साहेब को मिल सकते हो।

**राजीव मेहरा :-**

मैं ॲक्शन लेने के लिए नही बोल रहा हूँ।

**मा. सभापती :-**

ॲक्शन लेना पडेगा।

**राजीव मेहरा :-**

मैं आपसे पूछ रहा हूँ।

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब प्रायव्हेट आर.जी. मध्ये महापालिकेला पैसे घ्यायची गरज नाही. कौनसा आर.जी है।

**राजीव मेहरा :-**

शितलनगर.

**मा. सभापती :-**

नंबर है आपके पास.

**राजीव मेहरा :-**

नंबर नही मैंने पैसा दिया उसकी रसीद है।

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब बघून घ्या. महापालिका असे घेऊ शकत नाही. आर.जी. मे मंडप डाला है। मंडप डालने का परमिशन महापालिका दे रही है। मंडप डालने का परमिशन लेगा वह मंडप डालने का फीज है।

**राजीव मेहरा :-**

प्रायव्हेट प्रॉपर्टी पे मैं वही पूछ रहा हूँ।

**मा. सभापती :-**

एक एक्झाम्पल है आपके खूद के लॅन्ड पे आप बिल्डींग बनाते हो। म्युनिसिपल कॉर्पोरेशन का प्लान पास करके उसपे डेव्हलपमेंट चार्ज महापालिका लेती है। लॅन्ड आपकी है फीर भी महापालिका से परमिशन लेनी पडती है। वह रुल के अंदर है वैसे ही रुल के अंदर मंडप की परमिशन लिया होगा। फिर भी आयुक्त साहेब ह्या विषयात इनक्वायरी करुन बघून घ्या. जर चुकीचे असेल तर त्यांना पैस रिटर्न द्या.

**राजीव मेहरा :-**

बात वो नही मेरे को क्लिअर करने का था की यह है की नही। मैं रिफंड की बात नही कर रहा हूँ।

**मा. सभापती :-**

रिफंड लेना पडेगा।

**राजीव मेहरा :-**

लास्ट इयर मेरे से ३.५० लाख रुपये मांगा गया था। जिस दिन से मंडप बनाना शुरु करोगे उस दिनसे पैसा देना पडेगा।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. अनिल विराणी, अनुमोदन श्रीम. वर्षा भानुशाली. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. राजीव मेहरा. प्रथम दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. अनिल विराणी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

